उपवासासाठी
स्पेशल टक्कर
शाबुदाणा वडा
काजू- खिसमिस पॅटीस
स्वादिष्ट रेलचेल....बटाटा वडा सांबर
उडीद वडा सांबर-टेस्टी इडली सांबर
मसाला डोसा-दही वडा-टोमॅटो आम्लेट
उत्तप्पा-खास खुशखुशीत काला सोना
कैलास उडपी
उपवासाची स्पेशल कैलास मलाईलस्सी
शिवशक्ती अर्पाटमेंट, खिस्त गल्ली,पिराजवळ,अ.नगर

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
आता चष्मा घालवा कायमचा
चष्मा नको?
कॉन्टॅक्ट्स लेन्सेस ✲ मोतिबिंदू ✲ काचबिंदू ✲ नेत्रदोषण
डॉ. तांबकरियांचे
मोफत नेत्रतपासणी
सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
✲ शनिवार सकाळी १० ते १ ✲ नोंदणीसाठी आवश्यक
साईं सूर्य नेत्रसेवा
दृष्टी सावरी करा
✲ दोनदा प्राप्त हॉस्पीटल, पुणे ✲ सर्व तऱ्हे दोषांवर, इलाज
कार्यालय, सागिर भोंडे, ७ नगर ४१४००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नेत्रसाधनी टीम
जेनर नेत्रसाहित्याचा तांत्रिक विभाग
आंतरराष्ट्रीय दर्जाचे भारतातील ५० वर्षे अनुभवी डॉक्टर
Help line 9112288611 Appointment 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. ३०.०८.२०२४ | अंक नं. १५४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

सकाळी मंदिरात दर्शनासाठी चाललेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र पळवले

शनि चौकातील घटना; हेल्मेट घालून मोटारसायकलवर आलेले दोन चोरटे सिसिटिव्हीत कैद

नगर – सकाळच्या वेळी मंदिरात दर्शनासाठी रस्त्याने पायी चाललेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र मोटारसायकलवर आलेल्या दोघा आरोपी चोरट्यांनी हिसका मारून चोरून नेल्याची घटना शहरातील भरवस्तीत असलेल्या शनी चौकात शुक्रवारी (दि.३०) सकाळी ७.३० च्या सुमारास घडली. सदरची घटना परिसरातील सीसीटिव्ही फुटेजमध्ये कैद झाली आहे.

याबाबत प्रभावती जयंतीलाल ओसवाल (वय ६५, रा.ब्राम्हणगल्ली, माळीवाडा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी ओसवाल या दरशेज गुजर गल्ली येथील जैन मंदिरात दर्शनासाठी जात असतात. शुक्रवारी सकाळी ७.३० च्या सुमारास त्या नेहमीप्रमाणे माळीवाडा येथून शनी चौक मार्ग दर्शनासाठी रस्त्याने पायी जात असताना शनीचौकात समोरुन अचानक विना क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या टिव्हीएस कंपनीच्या रायडर मोटारसायकलवर दोन अनोळखी इसम आले. त्या दोन्ही इसमांनी हेलमेट व तोंडाला काळ्या रंगाचे मास्क लावलेले होते. त्यांनी फिर्यादी ओसवाल याच्या जवळ येत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारुन तोडले व भरधाव वेगात तेथून त्यांनी पोबारा केला. या घटनेमुळे गोंधळलेल्या फिर्यादी ओसवाल यांनी आरडाओरडा केला. त्यांचा आरडाओरडा ऐकून आजूबाजूचे नागरिक तेथ जमा झाले मात्र तोपर्यंत चोरटे तेथून पसार झालेले होते.

याबाबत प्रभावती ओसवाल यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात २ चोरट्यांविरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पो.है.कॉ. निता अडसरे या करीत आहेत. सदर चेन स्नॅचींगची माहिती मिळालयानंतर शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, कोतवाली पो.नि. प्रताप दराडे, स.पो.नि. विकास काळे यांच्यासह गुन्हे शोध पथकाच्या अंमलदारांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. परिसरातील सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता एका ठिकाणच्या फुटेजमध्ये चैन स्नॅचींगची ही घटना कैद झाली आहे. पोलिसांनी सदरचे फुटेज तपासासाठी ताब्यात घेतले असून गुन्हे शोध पथकाकडून या चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

रस्त्याच्या मधोमध असलेली उघडी गटार बनली मृत्यूचा सापळा

शहरातील सर्जेपुरा मंगळवार बाजार चौकात रस्त्याच्या मधोमध गटारीच्या बँबरला झाकण नसल्याने तो मृत्यूचा सापळा बनला आहे. या खड्डयात अनेक नागरिकांचे अपघात झाले आहेत. रात्रीच्यावेळी खड्डयात गुंतल्याने अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. (छाया धनेश कटारिया)

भरदिवसा घराचे लॉक कापून धाडसी घरफोडी

दीड लाख रुपयांचा ऐवज लंपास; केडगाव उपनगरातील घटना

नगर – भरदिवसा घराच्या दरवाजाला लावलेले लॉक कशाच्या तरी सहाय्याने कापून आत प्रवेश करत घरातील कपाटात ठेवलेली रोख रक्कम, सोन्या – चांदीचे दागिने असा १ लाख ५७ हजार ५०० रुपयांच्या ऐवज चोरुन नेल्याची घटना केडगाव उपनगरातील भाग्योदय मंगल कार्यालया जवळील इमारतीमध्ये गुरुवारी (दि.२९) सकाळी १०.४५ ते दुपारी ३.३० या कालावधीत घडली.

या बाबत बाबासाहेब यादव गाडगे (वय ५२, रा. नाथकृपा बिल्डींग, भाग्योदय मंगल कार्यालया शेजारी, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी गाडगे हे गुरुवारी (दि.२९) सकाळी १०.४५ वाजता नाथकृपा बिल्डींगमधील त्यांचे फ्लॅट क्र. ८ च्या दरवाज्याला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. ते पुन्हा ३.३० च्या सुमारास घरी परतले असता त्यांना दरवाजाला लावलेले कुलूप कशाच्या तरी सहाय्याने कापलेले दिसले.

त्यांनी घरात जावून पाहणी केली असता घरात सर्वत्र उचकापाचक झाल्याचे दिसून आले. त्यांनी कपाटाची पाहणी केली असता कपाटाचे लॉक तुटलेले दिसले व त्यात ठेवलेली रोख रक्कम, सोन्या – चांदीचे दागिने असा १ लाख ५७ हजार ५०० रुपयांच्या ऐवज दिसून आला नाही. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात चोरी केल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी कोतवाली पोलिसांना याबाबत माहिती दिली.

पोलिस निरीक्षक प्रताप दराडे, उपनिरीक्षक शिंदे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

याबाबत गाडगे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३३१ (३), ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

सफाई कर्मचाऱ्यांनी महापालिका युनियन पदाधिकाऱ्यांच्या बेमुदत उपोषणाला पाठिंबा देत कामबंद आंदोलन केल्याने शहरातील बाजारपेठांसह ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढिगारे. (छाया – लहू दळवी) सविस्तर वृत्त व छायाचित्र पान २ वर.....

शाळकरी मुलीला रस्त्यात अडवून कारमधून अपहरणाचा प्रयत्न; दोन महिलांनी धाडसाने दगडाचा मारा करत केली मुलीची सुटका

नगर – सकाळी रस्त्याने महाविद्यालयाकडे पायी चाललेल्या १६ वर्षीय शाळकरी मुलीला रस्त्यात अडवून तिला बळजबरीने कार कडे ओढत नेवून तिचे अपहरण करण्याचा प्रयत्न एका अनोळखी व्यक्तीने केला. मात्र त्याच वेळी तेथून मोपेडवर चाललेल्या २ महिलांनी धाडस करत त्या व्यक्तीवर दगडांचा मारा केल्याने त्याने मुलीचा हात सोडून तेथून पलायन केल्याची घटना तारकपूर बसस्थानकाजवळील हॉटेल थापर ते एका महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गुरुवारी (दि.२९) सकाळी ९.३० च्या सुमारास घडली.

याबाबत संबंधित शाळकरी मुलीने आपल्या कुटुंबियांसह तोफखाना पोलिस ठाणे गाठून याबाबत्ची फिर्याद दिली आहे. सदर फिर्यादी मुलगी ही एमआयडीसी जवळील नवनागापूर परिसरात रहावयास असून तारकपूर परिसरातील एका महाविद्यालयात शिक्षण घेते. गुरुवारी (दि.२९) सकाळी ९.३० च्या सुमारास नेहमी प्रमाणे ती घटना तारकपूर बसस्थानकाजवळील हॉटेल थापर पासून महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याने पायी जात असताना थोड्या अंतरावर गेल्यावर तिच्या समोर अचानक एक पांढऱ्या रंगाची कार येवून थांबली. त्यामधून अंदाजे २५ – २६ वर्षाचा एक युवक उतरला व त्याने तिचा हात पकडला. तिचा ओढत तो कारकडे नेवू लागला. त्यावेळी त्या मुलीने त्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता त्याने तिला चापटीने मारहाण केली. ती मुलगी आरडाओरडा करत त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करत असताना त्याच वेळी त्या रस्त्याने २ महिला एका मोपेड वर आल्या. त्यांनी धाडस दाखवत मोपेड थांबवून रस्त्याच्या कडेला असलेले दगड त्या अनोळखी व्यक्तीच्या दिशेने मारायला सुरुवात केली.

हे पाहून त्या व्यक्तीने त्या मुलीचा हात सोडून देत पटकन कार मध्ये बसून तेथून तो पसार झाला. त्या महिलांनी त्या मुलीला धीर देत तिच्या कुटुंबियांशी संपर्क साधला. तिचे कुटुंबीय ही तातडीने तेथे आले. त्यानंतर मुलीकडून घडलेल्या प्रकाराची माहिती धेवून तिला तोफखाना पोलिस ठाण्यात नेले. तेथे पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून सदर पिडीत मुलीची फिर्याद नोंदवून घेत त्या अनोळखी व्यक्ती विरोधात बी.एन.एस.२०२३ चे कलम ७४, ७८, ११५ (२), १३७ (२), ६२ सह पोक्सो कायदा २०१२ चे कलम १२ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

।। श्री ।।
श्रीजा क्लिनिक
डॉ. सौ. रितुजा श्रीकांत डुबेपाटील
B.A.M.S., Fellowship in General Medicine
।। शुभारंभ ।।
शनिवार ३१ ऑगस्ट २०२४
सायं. ७ वा. आयोजित केला आहे.
या निमित्त आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
✲ चिन्तित ✲
ॲड. चांगदेव डुबेपाटील परिवार
✲ स्थळ ✲
श्रीजा क्लिनिक, गणेश अपार्टमेंट, चिंतामणी हॉस्पिटल शेजारी, बालिकाश्रम रोड, अहमदनगर.

बजाज वॉटरप्रुफिंग कं.
जर्मन टेक्नॉलॉजी
तोडफोड न करता ५ वर्षांच्या सेकी गॅरंटीसह केमिकल वॉटरप्रुफिंग
स्लॅब, बाल्कनी, बाशल्म, पाण्याची टाकी ई.
9096291653

नामांकित टाईल्स्च्या शोरूमध्ये कामासाठी अनुभवी
अकौंटंट पाहिजेत
महिला/पुरुष
आकर्षक पगार
न्यू डि-मार्ट शेजारी, बंधन लॉन समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अ.नगर.
9822243434

फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

वाढलेल्या वजनाने त्रस्त आहात? वजन कमी करणे झाले सहज शक्य
7020025541

शाळेमध्ये CCTV लावणे मजबुरी नाही तर गरज आहे
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay 98222 94622 94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

।। श्री कुलस्वामीनी प्रसन्न ।।
गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
श्री तिरुपती बालाजी
दर्शनसह श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनसह कोल्हापूर महालक्ष्मी
✲ प्रतिव्यक्ती ₹ 6501/-
✲ समाविष्ट भोजी ✲
✲ ऑफिस ✲
Anand Prem Holidays & Multiple services

१६ वे पुण्यस्मरण...
प्रेम आपका था हम पर, करते है नमन आपको श्रध्दा सुमन अर्पित करते, रखेंगे स्मरण आपको
स्व. श्रीमती मायादेवी आसनदास नवलानी
स्व. रि. ३०/८/२००८
आपकी पावन स्मृती में भावपूर्ण श्रद्धांजली
– दु:खांकित –
प्रेमकुमार, महेशकुमार, हनिश, उज्वल
समस्त नवलानी परिवार
• लख्मीचंद जनरल स्टोअर्स, गंजबाजार, अ.नगर.
• विशाल हार्डवेअर माकेटयार्ड,अ.नगर • श्री बालाजी हार्डवेअर
प्रेमकुमार – ९४२३४६६६०५ । हनिश – ८९८९८१७९६४

पाहिजेत
अहमदनगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहमदनगर शाखेसाठी हवे आहेत
मॅनेजर जागा–1 (M) पदवीधर व तत्सम पदावर किमान ५ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक
कॅशियर जागा–1 (M) बँक, पतसंस्था येथे कॅशियर म्हणुन काम केल्यास प्राधान्य. टेली सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक
सेल्समन जागा–3 (M/F) तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक
अनुभवीना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
सुख्याद और दुकान साथ साथ
चंदुकाका ज्वेलर्स – सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी –
वसंत टॉकिज रोड, अहमदनगर 0241-2321512

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

HOTEL संत
आमची सव आहे वेगळी, म्हणूनच प्रत्येक जण म्हणतो लयभारी !
Special गुजराथी थाली
₹ ३२५/-
१ तिरुपती रोड, स्वस्तिक चौक, पुणे बस स्टॉप समोर, अहिल्यानगर - ४१४००१. ९४२१० ११२२२

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य नुंद्येवा

email - navamaratha@gmail.com

चांगली दहा पुस्तकं वाचण्याचा आनंद एका चांगल्या भाषणात मिळतो

'वाचाल तर वाचाल' हे जरी खरं असलं तरी आजकाल वेळ नाही असा सार्वत्रिक अनुभव आहे. त्यासाठी एक चांगले भाषण ऐकले तर दहा पुस्तकं वाचण्याचा आनंद घेता येतो, पण त्यासाठी आवर्जुन वेळ काढला पाहिजे. 'आवड असेल तर सवड मिळेल'. आजपासून दीनदयाळ परिवाराची विचारांची मांदियळी सुरू झाली आहे. चारही दिवस महत्त्वाची भाषणं होत आहेत. विशेषतः युवकांनी, महिलांनी, सृजनशील नगरकरांनी याचा अवश्य लाभ घ्यावा. किमान काही वेळ मोबाईलपासून लांब राहून ज्ञान आणि माहिती मिळेल, कसे बोलावे काय ऐकायचे हे समजेल. ते अनुभव आत्मसात करायला हवे.

चुदैवाने आपल्या शहरात विविध प्रकारे असे उपक्रम नेहमीच राबवले जातात. आपण चांगले भाषण करू शकत नसाल तर निदान चांगले श्रोते झाले पाहिजे. यातून समविचारी एकत्र येऊन विचारांच्या देवाणघेवाणीचे व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते. समाज, शहर, देश आणि इतर विषय, समस्या, चर्चा प्रबोधन करता येईल. सगळी मिळून एखादा उपक्रम, चांगल्या कृती करता येईल. खरं तर हे सगळ्यांना वाटते शिवाजी महाराजांसम कार्य झाले पाहिजे, पण सुरुवात शेजाऱ्या–पाजाऱ्यानं करावी. आता आपण सर्व पुढं येऊ या. निदान चांगले करणारे त्यांना पाठिंबा आणि प्रेरणा देऊ या.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"–९८२२०२०६९१

ज्योतिषाचार्य वाल्हेराजबाबा बिडकर यांचे निधन

नगर – नागपूर येथील ज्योतिषाचार्य वाल्हेराजबाबा बिडकर (वय ७५) यांचे २९ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर एम.आय.डी.सी. शेळके पंपाशेजारी (दफन) अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या मागे पप्पूबाबा बिडकर, जयेशबाबा बिडकर असा परिवार आहे.

लक्ष्मीबाई आंबेकर यांचे अल्प आजाराने निधन

नगर – माळीवाडा गणपती मंदिरा समोर राहणाऱ्या लक्ष्मीबाई बबनराव आंबेकर (वय ७०) यांचे २९ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ३० ऑगस्ट रोजी नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

सौ. रोहिणीबाई धोत्रे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील तोफखाना भागातील रहिवासी सौ. रोहिणीबाई सुभाष धोत्रे (वय ६७) यांचे २७ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती सुभाष धोत्रे, मुलगा निलेश धोत्रे असा परिवार आहे.

शंकरराव जाधव यांचे अल्प आजाराने निधन

नगर – अरणगाव येथील मेहेरबाबा पतसंस्थेचे व्हा. चेअरमन शंकरराव भाऊराव जाधव (वय ७५) यांचे २९ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अरणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

डॉ. रतिलाल मेहेर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – येथील गुलमोहोर रोड, नवलेनगर, नायरा पेट्रोल पंपाजवळील अमेय अपार्टमेंटम धील फ्लॅट नं. १०२ मध्ये राहणारे डॉ. रतिलाल शंकरराव मेहेर (आष्टीवाला, वय ८४) यांचे ३० ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अम रधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे एक मुलगा, चार मुली, सून, जावई, नातू असा परिवार आहे. जितेंद्र मेहेर यांचे ते वडिल होत.

ज्ञानेश्वर उरमुडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – पिंपळगाव वाघा (ता.नगर) येथील रहिवासी ज्ञानेश्वर बबनराव उरमुडे (वय ४४) यांचे २९ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. गावातील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, १ भाऊ, भाऊजय, २ मुले असा परिवार आहे. ते मार्केटयार्डमध्ये भुसार विभागात मापाडी होते.

सौ.रजनीताई धुमाल यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील सौ. रजनीताई हिंमतराव धुमाल (वय ६६) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

अशोक सह. साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन तथा लोकसेवा विकास आघाडीचे अध्यक्ष हिंमतराव (नाना) धुमाल यांच्या पत्नी, ऋतुराज धुमाल यांच्या मातोश्री होत.

चंद्रभागाबाई मडकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – माळीवाडा, वाडियापार्कजवळील रहिवाशी चंद्रभागाबाई दत्तात्रय मडकर (वय ९३) यांचे २३ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. रमाकांत मडकर व शशिकांत मडकर यांच्या त्या मातोश्री होत.

स्वातंत्र्यसैनिक स्व. दत्तात्रय शंकर मडकर यांच्या त्या पत्नी होत. नगर तहसील कार्यालयाकडून त्यांना श्रद्धांजली देण्यात आली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्तीपत्रबाबत आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी चर्चा करून निवेदन देताना खासदार निलेश लंके, बाळासाहेब बोराटे, अभिषेक कळमकर, दिलीप सातपुते, दिलीप सातपुते, परेश लोखंडे, कर्मचारी कृती समितीचे गुलाब गाडे, शरद भालेराव, बाळासाहेब उमाप, संजय साठे, लखन गाडे, संभाजी जावळे आदींसह सफाई कामगार व वारस पहिल्या छायाचित्रात तर युनियन पदाधिकाऱ्यांच्या उपोषणस्थळी येवून त्यांच्याशी चर्चा करताना खासदार निलेश लंके.

सफाई कामगारांच्या वारसांना मिळणार नियुक्तीपत्र

खा. निलेश लंके, माजी महापौर अभिषेक कळमकर, दिलीप सातपुते, बाळासाहेब बोराटे यांची मध्यस्थी

नगर – महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांना न्यायालयीन निर्णय व शासन आदेशानुसार नियुक्ती आदेश देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. राज्यातील इतर अनेक महानगरपालिकांनी शासन निर्णयाची अंमलबजावणी केली असताना अहमदनगर महानगरपालिका प्रशासनाकडून चालढकल सुरू होती. या पार्श्वभूमीवर खा. निलेश लंके यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त मुंडे तसेच आस्थापना विभाग प्रमुखांशी चर्चा करून पात्र वारसांना नियुक्ती पत्र देण्याची मागणी केली तसेच नियुक्ती पत्रावर अधिकाऱ्यांच्या सह्या घेतल्या व आयुक्त यांनी २ सप्टेंबर पर्यंत पुर्तता होईल असे आश्वासन दिले.

मनपाच्या आरोग्य विभागातील सफाई कामगारांचा अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला नियुक्त्यांचा प्रश्न खा. निलेश लंके यांनी काही तासांतच मार्गी लावल्याने कर्मचारी आनंदीत झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

पश्चाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक दिलीप सातपुते, बाळासाहेब बोराटे, परेश लोखंडे, कर्मचारी कृती समितीचे गुलाब गाडे, शरद भालेराव, बाळासाहेब उमाप, संजय साठे, लखन गाडे, संभाजी जावळे आदींसह सफाई कामगार व वारस उपस्थित होते.

अभिषेक कळमकर म्हणाले, कोणत्याही शहराचे, गावाचे आरोग्य चांगले ठेवण्यात सफाई कामगारांचा सिंहांचा वाटा असतो. अपुऱ्या सोयी सुविधा असूनही सफाई कामगार आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावतात. खरे तर समाजातील स्वच्छता दूत आहेत. लाड पागे समितीच्या शिफारशींचा लाभ सफाई कामगारांना दिला जात नव्हता. शासन निर्णय, न्यायालयाचा निकाल असतानाही वारसा हक्काने नियुक्ती दिली जात नव्हती. राज्यातील इतर महानगरपालिकांनी शासन आदेशाची अंमलबजावणी सुरू केली. मात्र नगर महापालिकेने या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केली होती. या पार्श्वभूमीवर खा. निलेश लंके यांच्या माध्यमातून मनपा प्रशासनास नियुक्ती आदेश देण्याचे काम सुरू केले आहे. सफाई कर्मचाऱ्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यात यश आले याचा आनंद आहे. त्यानंतर खा. लंके यांनी सातव्या वेतन आयोगासाठी उपोषणास बसलेल्या युनियनच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. यासंदर्भात महापालिका अधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याबाबत पाठपुरावा केला जाईल असे आश्वासन खा. लंके यांनी दिले आहे.

महापालिका कामगार युनियनच्या बेमुदत उपोषणास काँग्रेसच्या मंगल भुजबळ यांचा पाठिंबा

नगर – अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियनने २६ ऑगस्टपासून ७ वा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या बेमुदत आमरण उपोषणास काँग्रेसच्या वतीने राष्ट्रीय ओबीसी समन्वयक मंगल भुजबळ व प्रदेश सचिव दीप चव्हाण यांनी पाठिंबा देऊन कर्मचाऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

गेल्या ५ दिवसापासून कर्मचारी मुदगल, सारसर व राशीनकर हे बेमुदत उपोषणास बसले असून, आज त्यांची तब्बेत खालावली असल्याने त्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असता सारसर यांचा बीपी वाढल्याचे निदर्शनास आले. काँग्रेसचे प्रदेश सचिव दीप चव्हाण यांनी सर्व कर्मचाऱ्यांना उपोषणस्थळी जावून मार्गदर्शन केले. तसेच मंगल भुजबळ व दीप चव्हाण यांनी युनियनचे पदाधिकारी यांना महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे घेऊन जाऊन त्यांच्या सातव्या वेतन आयोगाबाबत चर्चा केली.

अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियनच्या बेमुदत आमरण उपोषणास काँग्रेसच्या मंगल भुजबळ यांनी पाठिंबा दिला. यावेळी दीप चव्हाण उपस्थित होते.

महापालिका कामगार युनियन पदाधिकाऱ्यांच्या आंदोलनास भाजपच्या शिष्टमंडळाने पाठिंबा दिला. यावेळी मार्गदर्शन करताना शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर. (छाया – लहू दळवी)

सातव्या वेतन आयोगाचा प्रश्न दोन दिवसात मार्गी लावा अन्यथा २ सप्टेंबरपासून मनपा कर्मचारी बेमुदत संपावर

काम 'बंद' करून सफाई कर्मचाऱ्यांचा उपोषणाला पाठिंबा; शहरातील गल्लीबोळासह सर्वत्र कचऱ्यांचे साचले ढिगारे; युनियन पदाधिकाऱ्यांचे उपोषण पाचव्या दिवशीही सुरुच

नगर – अहमदनगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी युनियनच्यावतीने बेमुदत आमरण उपोषण सुरू केले असून, शुक्रवारी (दि.३०) पाचव्या दिवशी सफाई कर्मचाऱ्यांनी 'काम बंद आंदोलन' केल्यामुळे शहरात सर्वत्र कचऱ्यांचे दीग पहावयास मिळत आहे. राज्य सरकारने येत्या दोन दिवसात सातव्या वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा २ सप्टेंबरपासून मनपा कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा युनियनने दिला आहे. यामध्ये वेळप्रसंगी अत्यावश्यक सेवाही पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असल्याचे संकेत युनियनने दिले आहेत.

पाचव्या दिवशी उपोषणकर्ते बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, बाबासाहेब राशिनकर यांची तब्येत ढासळत चालली असून, डॉक्टरांच्या वतीने सलाईन घेण्याची विनंती त्यांना करण्यात आली. मात्र उपोषणकर्त्यांनी ती नाकारली आहे. जोपर्यंत सातवा वेतन आयोग लागू होत नाही, तोपर्यंत आम्ही उपोषण सोडणार नाही, या भूमिकेवर उपोषणकर्ते ठाम आहेत.

अहमदनगर मनपा कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी पाचव्या दिवशीही उपोषण सुरू असून, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भाजपच्या महिला अध्यक्षा प्रिया जाधव, सावेडी मंडलाध्यक्ष नितीन शेलार, माजी सभागृह नेते रर्वीद्र बारस्कर, महेंद्र गंधे, डॉ. सतीश राजूरकर, आनंद वायकर, मेहेर लहारे, बाळासाहेब गायकवाड, गीता गिल्ला, रामदास आंधळे, गोपाळ वर्मा, दत्ता गाडळकर, मनोज ताठे, अरुण शिंदे, राजेंद्र सातपुते, बाबासाहेब सानप आदी उपस्थित होते.

मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा, यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी भेट घेणार आहे. यामध्ये पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येत कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागणे गरजेचे आहे. मनपा कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही, कर्मचाऱ्यांना उपोषण करण्याची वेळ येऊ दिली नव्हती पाहिजे. महापालिका कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सापूर्ती देखील प्रयत्न केले आहे, तरी कर्मचाऱ्यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी केली.

मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी सफाई कर्मचाऱ्यांनी स्वतःहून काम बंद आंदोलन केले, मात्र आम्ही त्यांना कामावर जाण्यास सांगितले असून, सोमवारपर्यंत हा प्रश्न मार्गी न लागल्यास मनपाचे सर्व कर्मचारी बेमुदत संपावर जाणार आहे. आता कर्मचाऱ्यांनीच आंदोलन हाती घेतले असून ते ऐकायला तयार नाहीत, कर्मचाऱ्यांचा प्रश्न रास्त असून, महागाईच्या काळामध्ये हा प्रश्न मार्गी लागणे गरजेचे आहे. ज्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचा पगार दोन–दोन, तीन–तीन महिने होत नाही, त्या महापालिका कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग मिळत आहे. आमदार संग्राम जगताप व भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी राज्य सरकारकडे कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी पाठपुरावा केला आहे. सोमवारपासून महापालिका कर्मचारी पाणीपुरवठा आरोग्य विभाग, दवाखाने, स्वच्छता, स्ट्रीट लाईट बंद ठेवणार असल्याची माहिती युनियनचे सचिव आनंद वायकर यांनी दिली.

सफाई कामगारांनी शुक्रवारी पहाटेपासून कामबंद आंदोलन पुकारल्याने शहरातील विविध भागात तसेच रस्ते, गल्ही बोळात कचऱ्याचे ढिगारे साचले होते. त्यामुळे नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला. बाजारपेठेतील व्यापारी, व्यावसायिकांनी आपल्या दुकानांसमोरील कचरा स्वतः हातात झाडून घेवून साफ केला. या आंदोलनाची तीव्रता वाढल्यास शहरातील पाणीपुरवठा, लाईट, साफसफाई, आरोग्यसेवा आदी दैनंदिन व्यवस्थेवर त्याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे.

मंदिराच्या कळसावरून पडून कामगाराचा मृत्यू

दोघांवर निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत गुन्हा दाखल

नगर – मंदिरावर केलेल्या लाईट डेकोरेशनचे साहित्य काढण्यासाठी कळसावर चढलेल्या कामगार युवकाचा पाय घसरून खाली पडल्याने गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना नगर जवळील नागरदेवळे गावात घडली आहे. शरद दौलत शेलार (वय ३२, रा. अग्रवाल गोडाऊन जवळ, बुरूडगाव रोड) असे मयताचे नाव आहे. निष्काळजीपणामुळे हा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवत भिंगार कम्प पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

नागरदेवळे गावात असलेल्या नागेश्वर मंदिर परिसरात बुधवारी (दि.२८) सकाळी १० च्या सुमारास ही घटना घडली आहे. श्रावण महिन्यानिमित्त नागेश्वर मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती. हे काम बुरूडगाव रोडवरील फुलसौंदर मळा येथील विठ्ठल शिंगवी व अक्षय विठ्ठल शिंगवी या लाईट डेकोरेशन व्यावसायिकांनी घेतलेले होते. त्यांच्याकडे मयत शरद शेलार हा कामाला होता. बुधवारी (दि.२८) सकाळी ९० च्या सुमारास मंदिरावर केलेल्या लाईट डेकोरेशनचे साहित्य काढण्यासाठी शिंगवी यांनी शरद शेलार यास कळसावर जाण्यास सांगितले.

तो कळसावर चढल्यानंतर काम करत असताना पाय घसरून मंदिराच्या कळसावरून थेट खाली जमिनीवर कोसळला. उंचावरून पडल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला त्याचा मित्र अक्षय शिंदे (रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) याने तातडीने खाजगी वाहनाने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथे त्याच्यावर उपचार सुरु असताना सायंकाळी त्याचा मृत्यू झाला असल्याचे मेडिकल ऑफिसर डॉ. बटुळे यांनी घोषित केले.

या बाबतची माहिती मिळालयावर भिंगार कॅम्प पोलिसांनी बुधवारी (दि.२८) सायंकाळी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मात्र मयत शरद शेलार याचा भाऊ संतोष दौलत शेलार याने गुरुवारी (दि.२९) सायंकाळी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली की, सदर मृत्यू हा विठ्ठल शिंगवी व अक्षय विठ्ठल शिंगवी यांच्या निष्काळजीपणामुळे झाला आहे. त्यांनी मयत शरद यास मंदिराच्या कळसावर कामासाठी आण्यास सांगताना सुरक्षेची कुठलीही काळजी घेतली नसल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम १०६ (१) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

गृहिणी

आरोग्य

यासाठी घ्या सकस आहार

उत्तम वाढीसाठी, भरपूर श्रम करता येण्यासाठी आणि निरोगी राहण्यासाठी चांगल्या व सकस अन्नाची गरज असते. पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे किंवा न मिळाल्यामुळे जो अशक्तपणा निर्माण होतो त्याला कुपोषण असे म्हणतात. यासाठी करवंदे, बोरे ही 'क' जीवनसत्त्व असणारी फळे खा. ही नैसर्गिक साखर यांनी भरलेली असतात. त्यांचा वापर अन्नपूरक व जीवनसत्त्वे म्हणून करावा.

पाककला

पेरूची स्वीट डिश

साहित्य : पेरू (शक्यतो बिनबियांचे अगर कमी बियांचे घ्यावेत), साखर, लिंबू, आले, शेंदेलोण, पादेलोण, मीठ.

कृती : पेरूची साल काढावी आणि पेरू चिरून आतील बिया काढून टाकून बारीक फोडी कराव्यात. त्या फोडींवर तेवढीच साखर घालावी व थोडेसे पाणी घालून एक तास ठेवून द्यावे.

नंतर त्यात किंचित मीठ व चवीप्रमाणे शेंदेलोण व पादेलोण यांची पूड, आल्याचा रस व लिंबाचा रस घालावा व कालवून डिशमधून खावयास द्यावे. फार चविष्ट लागते.

वास्तू

दिवाणखाना (हॉल) बाबत

* बैठक खोलीचे द्वार आणि प्रवेशद्वार (काही अपवाद वगळता) हे एकच असते व ते शुभ दिशेत ईशान्य, उत्तर, पूर्व पश्चिम–वायव्य व दक्षिण–आग्नेयमध्ये असणे योग्य असते.
* बैठक खोलीचा उतार पूर्व, उत्तर अथवा ईशान्य दिशेस असावा.

सल्ला

पाय स्वच्छ व सुंदर करण्यासाठी आधी वॉक्सिंग करावे.

सौंदर्य

फाउंडेशन क्रीम, लोशन आणि केक या तिन्ही प्रकारांत उपलब्ध आहे. ज्यांची त्वचा कोरडी आहे त्यांनी क्रीम स्वरुपातील फाउंडेशन लावावे.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शनिवार, दि. ३१ ऑगस्ट २०२४

शनिप्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, पुष्य १९:४०, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य

मेष : महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला नाही.

वृषभ : इच्छित कार्य योग्य वेळी होतील. आर्थिक लाभ होईल.

मिथुन : आपला एखादा मित्र आपल्या विचारांबद्दल महत्वपूर्ण सल्ला देऊ शकतो.

कर्क : आपल्या कुटुंबातहील वाद आपणास आज अस्वस्थ करतील.

कन्या : राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील.

सिंह : आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. मागील उधारी वसुल होईल.

तूळ : आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील.

वृश्चिक : सामाजिक कार्यामध्ये सहयोग अनुकूल राहील व मान–सन्मान वाढेल.

धनु : बेपवाई, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. वाहन चोरी होण्याची शक्यत आहे.

मकर : हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. फिजूल गप्पांमध्ये आपला वेळ वाया जाईल.

कुंभ : आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल.

मीन : तरविलेले पूर्ण करण्यासाठी असे प्रसंग प्रेरणादायी ठरतील. निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

सोडा

डॉक्टर : ''तुमच्या दुखण्यावर एकच इलाज आहे. तुम्ही दारू सोडा''
रोगी : ''डॉक्टर साहेब, सोडा नाही घातला तर नाही का चालणार''

...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* दुहेरी राज्यव्यवस्था रद्द ज्याने केली तो ब्रिटीश गव्हर्नर – वॉरन हेस्टींग
* पहिला स्वयंपेशी सजीव प्राणी – अमीबा

संदर्भ – 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ७०००

सौ.शैलजा कुलकर्णी

आडवे शब्द :– १) हाताच्या करंगळी जवळचे बोट ४) जेथे पीक चांगले येते अशी जमीन वगैरे ६) सर्व; समस्त; सारे ७) खूप; मुबलक; पुष्कळ ८) धनुष्य; धनुष्याकृतीसारखे बांधकाम; महिरप १०) समान संख्यांचा गुणाकार; वध; नाश ११) सायंकाळ; संध्याकाळ १२) सुगम; अवघड नसलेला; पडवी; ओसरी १३) ४) मंद; आळसावलेला ५) आई; जननी; माय १४) समुद्रात लागलेला अग्नी १६) येणेजाणे; राबता; वर्दळ; शेत; रान १७) गरीब; रंक १९) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर २०) चक्कर; भोवंडा

उभे शब्द : – १) अस्सल; खरे; सत्य; नकली नसलेले २) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय ३) आय; कमाई ४) मंद; आळसावलेला ५) उणीव; कसर; वानवा ७) मुंज झाल्यानंतर गळ्यातून अडकवितात तो दोरा; यज्ञोपवीत ९) राजस्थानातील एक भाग ११) फणसाची एक जात १२) आठवडयातील एक दिवस १३) हिंदी महासागरातील देश असलेले एक बेट १४) राबता; उकाडा १५) इमारत; बिल्डिंग; भवन १८) निषध देशाचा राजा; दमयंतीचा पती

शब्दगंध क्र. ६९९९ चे उत्तर

प		ला	स		पा	व		रा
सं	ला	प		त	रं	ग		
त	प	सी	ल		प		प	
	रा		सा	ही	ल	सा	र	
पा	ड	ला	ग				ब	ल
रा	क	ट		वे	ज		घो	
सा		सा	क	ल		क	ळी	
र		टी	ब		सा	सा		

फिल्मीचक्कर क्र. ११५२ चे उत्तर

दि	ल	दे	ग	दि	वा	ना		
ल			जा				गा	
दि	ल	की	बा	जी			पा	प
व			द्ध			प	ठे	ल
द	ग	ल		ब			क	
दं		बा	ग	ग		र		
ठि		ब		र			घो	
ब		ल		घी	ल	जी	र	

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : आपले ध्येय योग्य असेल तर तुम्हाला आलेले अपयश पुढे जाण्यासाठी हिंमत देईल.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

वृत्तपत्रे केव्हा सुरू झाली?

आजकाल दिवस उजाडतो तो वृत्तपत्र विक्रेत्यांच्या आरोळ्यांनी. या आरोळ्या हीच आपली भूपाळी ठरते. सकाळी उठून हातात पेपर पडला नाही तर आपण अस्वस्थ बनतो. वृत्तपत्रांतून घरबसल्या आपल्याला जगभरच्या बातम्या कळतात. सिनेमांच्या जाहिरातीही बघायला मिळतात.

चीनमध्ये सुमारे १००० वर्षांपूर्वी 'चिंग पाव' नावाचा एक जाहीरनामा निघायचा. चिंग पाव याचा अर्थ राजधानीतील घडामोडी, या जाहीरनाम्याद्वारे सरकार जनतेला राजधानीतल्या घटनांची माहिती देत असे.

इ. स. १७७२ मध्ये लंडनमध्ये 'मॉर्निंग पोस्ट' हे वृत्तपत्र सुरू झाले. हे आधुनिक अर्थाने खरे वृत्तपत्र, त्याआधी व्हेनिसमध्ये मिंतीवर सरकारी गॅझेटियर चिकटवण्यात यायचे. हे गॅझेटियर का? तर याची किंमत एक 'गॅझेटा' होती. पुढे बऱ्याच वृत्तपत्रांनी 'गॅझेट' हे नाव स्वीकारले.

मध्यंतरी आर्थिक संकटात सापडलेले नि संपामुळे बंद झालेले नि आता पुन्हा चालू. होऊन बंद पडण्याच्या मार्गावर असलेले 'लंडन टाइम्स' हे आजचे सर्वात जुने वृत्तपत्र. भारतातल्या 'बेंगाल गॅझेट'ची सुरुवात ही भारतीय वृत्तपत्रसृष्टीची सुरुवात मानण्यात येते. इ.स.१९८० मध्ये भारतीय वृत्तपत्रसृष्टीची द्विशताब्दी साजरी करण्यात आली.

भाड्याचे घर

एक गाव होते. त्या गावात एक श्रीमंत सावकार राहात होता. स्वभावाने अतिशय चांगला होता. त्याला लोकांना मदत करण्याची सवय झाली होती. जरी तो मोठा श्रीमंत सावकार असला तरी त्याला गर्व नव्हता.

त्याने आपल्या स्वखर्चाने गावात मोठी धर्मशाळा बांधली होती. त्याने ती धर्मशाळा सर्वांसाठी खुली केली होती. त्या धर्मशाळेत राहणारे जात, धर्म, गरीब, श्रीमंत असा भेदभाव मानत नसत. त्या धर्मशाळेत कुणालाही, कितीही दिवस थांबायची मुभा होती. परंतु त्या धर्मशाळेतील एकच अट होती ती म्हणजे मालक सांगेल त्या दिवशी धर्मशाळेतील खोली सोडावी लागत असे.

एकदा त्या गावात व्यापारी आपल्या कामानिमित्त आले. त्यांनी त्या धर्मशाळेत तीन खोल्या घेतल्या. ते तिघेही व्यापारी असल्यामुळे त्यांना आपल्या मुक्कामाची सोय करणे आवश्यक होते. म्हणून ते धर्मशाळेत आले. त्या तिघांनी आपला व्यापार अगदी व्यवस्थितपणे सुरू केला व त्यात त्यांनी अतिशय प्रमाणात नफाही कमावला. परंतु दोन महिन्यांनंतर धर्मशाळेच्या मालकाने त्यांना माझ्या खोल्या रिकाम्या करून पाहिजेत म्हणून सांगितले.

धर्मशाळेच्या मालकाने व्यापाऱ्यांना खोली खाली करायला सांगितल्यामुळे व्यापाऱ्यांवर मोठे संकट आले. त्यांनी विनंती करून मालकाला सांगितले की, ''आम्हाला अजून थोडे दिवस तुम्ही राहू द्या.'' परंतु मालकाने त्यांचे ऐकले नाही. मालकाने त्यांना सांगितले, ''तुम्ही दोन महिन्यांपासून या खोल्यांमध्ये राहात आहात, परंतु आता तिथे दुसऱ्या लोकांनाही राहायला मिळाले पाहिजे. दुसरे गरजू लोकदेखील आहेत.'' त्यानुसार पहिल्या व्यापाऱ्याने मुकाट्याने आपली खोली रिकामी करून दिली. दुसऱ्या व्यापाऱ्याने मालकाला परत विनंती केली की, थोडे दिवस तुम्ही राहू द्या. पण मालक अडून बसला.

तेव्हा दुसऱ्या व्यापाऱ्यालादेखील ती खोली सोडावी लागली. कारण काही केल्या तो मालक ऐकायला तयार नव्हता व म्हणून त्याने ती खोली रिकामी करून दिली. तिसरा व्यापारी मात्र म्हणाला, ''मी काही खोली सोडणार नाही. जेव्हा मला असे वाटेल की, जायला पाहिजे तेव्हाच मी येथून जाईल अन्यथा येथून जणार नाही.''

यावर मालक संतापला व त्याने नोकरांना बोलावले. त्याच्या नोकरांनी त्या तिसऱ्या व्यापाऱ्याला उचलून बाहेर फेकून दिले व त्याला चांगला धडा शिकवला व सांगितले की, ''पुन्हा येथे येऊ नये.''

तात्पर्य : यावरून एकच बाब लक्षात येते की, माणसाच्या चांगुलपणाचा जास्त फायदा घेऊ नये. 'ऊस गोड लागला म्हणून तो मुळासकट खाऊ नये' असे याचे तात्पर्य आहे.

जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

उसी अवस्था के बारे में यहाँ समझाया जा रहा है। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

गुरु सेवउ करि नमसकार ।।
आजु हमारै मंगलचार ।।
आजु हमारै महा अनंद ।।
चिंत लथी भेटे गोबिंद ।।

जो सद्गुरु है, जिसकी शरण में हम आए हैं, उसका मैं सच्चा सेवक बन गया हूँ। सच्चा सेवक कौन है ? जो गुरु के बताए हुए रास्ते पर चले। अगर हम किसी महापुरुष की शरण में आयें और वहाँ पहुँचकर अपनी मन मर्जी चलायें, तो वह ठीक नहीं। हम कहें कि हमने इस तरह से जीना है, ऐसे करना है, तो उसका कोई फायदा नहीं है। सच्चा सेवक वही होता है, जो गुरु के बताए हुए रास्ते पर चले। वह रास्ता सही है, जो हमें सच्चा इंसान बना दे। जब हम सच्चे सेवक बन जाते हैं,

जब हम अपना तन, मन, धन सब कुछ प्रभु की ओर न्योछावर कर देते हैं, तभी हम सही मायनों में अंतर में बसंत ऋतु को पा सकते हैं। संत दर्शनसिंहजी महाराजने फ़ारसी के अपने एक शेर में कहा

बजुज़ साकी मरा थारे न बाशद
बजुज़ इश्क मरा कारे न बाशद इसका

हिन्दी में अनुवाद इस प्रकार है– 'साक़ी', सद्गुरू को छोड़कर मेरा कोई मित्र नहीं है और उसके प्यार के सिवाय मुझे कोई काम नहीं है। जब तक हम अपना ध्यान बाहर की दुनिया से नहीं हटाएंगे, जब तक हम ऐसा जीवन व्यतीत नहीं करेंगे, जिसमें हमें सतगुरु के प्यार के सिवाय और कोई काम ही न हो, तब तक हमें कोई लाभ नहीं होगा। सबसे ज़रूरी काम यही है कि हम अपने सद्गुरु से प्यार करें और जब तक हम अपने सद्गुरु से प्यार नहीं करेंगे, तब तक हम प्रभु को नहीं पा सकेंगे। हमारा सबसे अच्छा दोस्त, सबसे अच्छा मित्र हमारा सद्गुरू है और उसके सिवाय बाहर के रिश्ते–नाते चंद क्षणों के हैं।

अपने सतगुरु के ज़रिये प्रभु की सत्ता से जुड़ जाते हैं, तो वह हमारे साथ सदा–सदा के लिए रहती है, क्योंकि वह सत्ता किसी इंसान ने उत्पन्न नहीं की, वह सत्ता परमात्मा ने खुद–ब–खुद बनाई है। वह सदा–सदा के लिए रहती है, सृष्टि की शुरुआत से पहले भी वही सत्ता थी और वह अनंत काल तक रहेगी। जब हम प्रभु–सत्ता से जुड़ जाते हैं, तो बाहर की सभी चीजें फीकी लगने लगती हैं क्योंकि हमें यकीन हो जाता है कि बाहर की दुनिया temporary है, चंद दिनों के लिए है, चंद सालों के लिए है।

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

रना कोई डरने की बात नहीं है। यह आपके जीवन का सबसे अद्भुत अनुभव हो सकता है। यह सब इस बात पर निर्भर करता है कि आपने किस प्रकार जीवन व्यतीत किया है। स्विस–अमरीकन मनोचिकित्सक स्व. एलिजाबेथ कुबलर रॉस ने लिखा है, जिसने न केवल ऐसे हजारों मरीजों की देखभाल की, बल्कि उनसे भेंट–मुलाकात भी की, जो या तो मरणासन्न थे या मौत के मुँह में जाते–जाते बचे थे।

एलिजाबेथने पारंपरिक पश्चिमी चिकित्सा संबंधी शिक्षा पाई थी, लेकिन बाद में उनके मन में यह विश्वास पक्का हो गया कि सृष्टि शक्ति का अंतिम स्रोत शुद्ध प्रेम है, कि आध्यात्मिक शक्ति अथवा ऊर्जा का हमारा जो स्वरूप है, वह स्वरूप प्रेम का है और यह भी कि बिना शर्त प्रेम करने का ज्ञान पाना हमारे जीवन का सबसे ऊँचा लक्ष्य है। मृत्यु सन्निकट अनुभव संबंधी अध्ययन में अग्रणी मानी जानेवाली इस लेखिका ने पाया कि जो लोग नैदानिक दृष्टि से मर चुके हैं और फिर आपबीती सुनाने के लिए जी उठे, वे बताते हैं कि उन्हें जीवन को बदल देने वाले 'विचारों के आविर्भाव' का अनुभव हुआ। कभी–कभी इसमें पैगंबर संबंधी चेतावनियाँ और अंतर्दृष्टियाँ शामिल रहती थीं तथा एक ऐसी अनुभूति कि हम चारों तरफ से अतीत, वर्तमान और भविष्य से एक–एक जानकारी से घिरे हुए हैं।' प्रत्येक के लिए, वहाँ एक चमत्कारी रोशनी थी, गरमाहट बिखेरती हुई, जिसने उन्हें समझाया कि 'जीवन के अर्थ की एक ही व्याख्या है और वह है प्रेम।' डॉ. कुबलर–रॉस विशेषकर अपने इस सिद्धांत से विख्यात थीं कि बड़ेबड़े नुकसानों, विशेषकर आसान मृत्यु के साथ समझौता करने की स्थिति तक हमारे पहुँचने को इस तरह समझा जा सकता है कि यह समझौता पाँच चरणों में संभव हुआ होगा। उनके द्वारा प्रस्तुत उदाहरण में, पहली संभावित प्रतिक्रिया है। मैंने वैसे ही पिता जी से कहा कि फलामपा सुन्दर सेन्टर बन रहा है, वहाँ का नक्शा बनाने का भाग्य मुझे मिल रहा है, आप मुझे छुट्टी दे दो। पिता जी ने छुट्टी दे दी। वहाँ सेवा करते–करते एक महीना बीत गया। फिर दीदी ने कहा, आपको यहाँ आये महीना हो। गया, आपके पिता जी परेशान हो गये होंगे, आप एक बार घर होकर । आओ। मैंने कहा, नहीं दीदी, उनको पता है कि यहाँ सेवा है, वे कुछ नहीं। कहेंगे लेकिन दीदी ने कहा, नहीं, नहीं। आप एक बार कुछ दिन जाकर आओ। बाद में देखेंगे। घर आये तीन दिन ही हुए थे कि भाई साहब का। फोन आया कि एक नया सेन्टर बनाना है, वहाँ का नक्शा बनाना है। अगले दिन चक्रधारी दीदी का फोन आया कि भाई साहब आपको याद भाई साहब का लक्ष्य यह होता था कि जब किसी कन्या ने निर्णय ले लिया है कि मुझे सेन्टर पर ही रहना है, तो ऐसी कन्या को ज्यादा। दिन घर में नहीं रहने देना है, उसको घर के वातावरण के प्रभाव में आने नहीं देना है। उसको सदैव सेन्टर के वातावरण में ही रहना है। इसलिए वे चक्रधारी दीदी को बार–बार कहते थे कि उस कन्या को आप बुला लो, उससे जल्दी से जल्दी नक्शा बनवाना है। मैं सेन्टर पर जाने लगी तो पिता जी वहीं आँगन में खड़े थे और बोलने लगे कि मुझे पता है, तुम्हारी बहन भी चली गयी और तुम भी वहीं चली जाओगी। मैंने कहा, नहीं डैडी, ऐसा नहीं है। वहाँ नक्शा बनाने की सेवा है। सब आपको पूछते रहते हैं, आपके फादर क्या करते हैं, उनको यहाँ कभी बुलाओ, वे देखें तो सही कि उनकी बच्चियाँ क्या सेवा कर रही हैं, कितनी अच्छी सेवा कर रही हैं ! इसलिए आपको बीच–बीच में हमें देखने के लिए आना चाहिए। वे चुप हो गये।)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

षष्ठे मासि गर्भस्य बलवर्णोपचयो भवति अधिक अन्येभ्यो मासेभ्यः तस्मादृत्ता गर्भिणी बलवर्ण हानि मापद्यते विशेषेण।

– चरक शारीरस्थान (४–२२)

सहाव्या महिन्यात गर्भाचे बल व वर्ण ही रूपे व्यक्त होतात; त्यामुळे गर्भाची शक्ती वाढेल, गर्भ बलवान होईल व आपले बाळ निरोगी जन्माला येईल. याकरिता मातेने डॉक्टरांकडून आहाराची व आयुर्वेदिक औषधांची योजना करून घ्यावी. कारण या महिन्यात गर्भवतीचे बल व वर्ण यांची हानी होऊ शकते. बाळाचा रंग गोरा, उजळ होण्यासाठी गर्भवती स्त्रीने दूध, तूप, शिरा, ताक, लोणी, भात, केशरयुक्त दूध, सूवर्णसिद्धजल यांचा आहारात वापर करावा.

सहाव्या महिन्यातील वाढ केशर प्रति प्रमाणात वापरू नये. ते उष्णगुणात्मक असते. केशराच्या १ ते २ काड्या दुधातून घ्याव्यात. या महिन्यात बाळाच्या त्वचेवर केस येऊ लागतात. बाळ पापण्यांची हालचाल करून डोळे उघडझाप करते. हातापायाचे ठसे दिसू लागतात. गर्भलांबी : १० इंच, गर्भवजन : ६०० ग्रॅम. **सातवा महिना :**

सप्तमे मासे गर्भः सर्वैः भावैः आप्यायते ।
गर्भिणी क्लान्ततमा भवति ।

– चरक शारीरस्थान (४–२३)

या महिन्यामध्ये गर्भाचे सर्व अवयव अंग प्रत्यंग तयार झालेले असतात.

त्यामुळे या महिन्यात गर्भवतीला थकवा येतो. या महिन्यात बाळ डोळ्यांची उघडझाप करते आणि त्याचा अंगठा चोखते, बाळ हाता–पायांची हालचाल करुन त्याचा तो एक प्रकारचा व्यायाम करतो. सातव्या महिन्यातील वाढ जर बाहेर मोठा आवाज झाला, तर बाळ त्याला प्रतिसाद देते. या महिन्यात बाळाचा जन्म झाला, तर ते ख.उ.ण. मध्ये ठेऊन जगू शकते. गर्भलांबी : ९५ इंच, गर्भवजन : १००५ ग्रॅम.

अष्टमे अस्थिरौ भवति ओजः।
तत्र जातश्चेनः जीवेत् निरोजस्वात् नैऋत्य भागत्वाच।
– सुश्रुत शारीरस्थान (६–३०)

आयुर्वेदामध्ये सप्तधातूंचा सार म्हणजे ओज ही संकल्पना सांगितलेली आहे. थोडक्यात ओज म्हणजे तेजस्वरूप शक्ती. या महिन्यामध्ये प्रसूती होणे धोक्याचे असते. या महिन्यात चुकून प्रसूती झाली, तर बाळ–आई यापैकी ज्याच्याकडे ओज असेल त्याच्या जीवाला धोका पोहचत नाही;

आठव्या महिन्यातील वाढ परंतु ज्याकडे ओज नाही त्याच्या जीवाला धोका पोहोचू शकतो. आता आधुनिक काळात सुसज्ज अशी उपकरणे, मशिनरीज् आल्यामुळे माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी झालेले आहे. या महिन्यात बाळाच्या मेंदूची वाढ जास्त प्रमाणात होते. आईला बाळाची हालचाल खूप जाणवते. बाळ गोलाकार फिरल्यासारखे वाटते. आपण बाळाची पाठ कोणत्या बाजूस, हातपाय कुठल्या बाजूस तसेच डोके कुठे आहे, हे ओळखू शकतो.

– डॉ. शारदा निर्मल–महांडुळे
दुर्बाकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

हिंदूंच्या आर्थिक उत्थानासाठी व सामर्थ्यासाठी विश्व हिंदू परिषदेचे काम

केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांचे प्रतिपादन; विश्व हिंदू परिषदेच्या हिंदू संमेलनास प्रतिसाद

नगर – श्रीराम जन्मभूमीचे आंदोलन हे हिंदू अस्मितेचे आंदोलन होते. या आंदोलनामुळेच विश्व हिंदू परिषदेची पूर्ण जगात ओळख निर्माण झाली. या आंदोलनामुळे पूर्ण देशत मोठे परिवर्तन झाले असून हिंदूंचा अपमान करून कोणीही यशस्वीपणे राजनीती करू शकणार नाही अशी ताकद निर्माण झाली आहे. ही विश्व हिंदू परिषदेचे कार्याची उपलब्धी आहे. हिंदूंच्या रक्षणासह आता हिंदू समाजाच्या आर्थिक उत्थानासाठी व सामर्थ्यासाठी विहिंप काम करत आहे. या माध्यमातून हजारो नागरिकांना विहिंपने रोजगार निर्माण करून देत पायावर उभे केले आहे. त्यामुळे सेवा घेणारे हात आता सेवा देणारे झाले आहेत हे समाज परिवर्तन होताना दिसत आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी केले.

विश्व हिंदू परिषदेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या सांगता सोहळ्यानिमित्त नगरमध्ये आयोजित हिंदू संमेलना मध्ये विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी समर्थभक्त मोहनबुवा रामदासी व मंगल भक्त सेवा मंडळाचे राजाभाऊ कोठारी यांचे आशीर्वाचन झाला. या संमेलनास विहिंपचे प्रांत धर्मचार्य प्रमुख ह.भ.प माधव राठी महाराज, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, जिल्हा मंत्री अनिल जोशी, विभाग मंत्री सुनील खिरसी, जिल्हाध्यक्ष अॅड. जयदीप भोसले, प्रांत सहमंत्री सतीश गोरडे, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक सचदेव, बजरंग दल संयोजक कुणाल भंडारी आदींसह हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, नागरिक व महिला उपस्थित होते. भारतमातेच्या जयजयकाराने व जय श्रीरामाच्या जयघोषाने सभागृहातील वातावरण चैतन्यमय झाले होते.

विश्व हिंदू परिषदेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या सांगता सोहळ्या निमित्त नगरमध्ये आयोजित हिंदू संमेलनाचे उद्घाटन करताना केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे. समवेत मोहनबुवा रामदासी, राजाभाऊ कोठारी, ह.भ.प माधवराठी महाराज, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, जिल्हा मंत्री अनिल जोशी, जिल्हाध्यक्ष जयदीप भोसले आदी.

मिलिंद परांडे पुढे म्हणाले, जुन्या काळापासून चालत आलेल्या सामाजिक कुरीतींपासून मुक्त करून हिंदू समाजास निर्दोष, शोषण मुक्त, ज्ञानवान, कर्तृत्ववान होण्यासाठी आता काम केले जात आहे. हिंदू तत्त्वज्ञान खूप श्रेष्ठ आहे. पण याचे पालन न करण्यामुळे व जाती भेदामवापूर्ण आचारणामुळे हिंदू धर्म आतून कमजोर होत चालला आहे. त्यामुळे अनेक पाश्चिमात्य व्यवस्था आज हिंदूंच्या हातातून गेले आहे. धावता आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक सचदेव यांनी केले. प्रस्तावित कुणाल भंडारी यांनी केले. जिल्हा मंत्री अनिल जोशी यांनी आभार मानले.

यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा कार्यवाह हिरामंत रामदासी, बजरंग दलाचे क्षेत्रिय संयोजक विवेक कुलकर्णी, अण्णा पंडित, धनाजी शिंदे, आशुतोष लांडगे, वसंत लोढा, दिलीप सातपुते, वसंत सिंग, विष्णू तवले आदी उपस्थित होते.

हिंदूंनी दुसऱ्या हिंदुशी भेदभाव न करता हिंदुत्व जपावे यासाठी विश्व हिंदू परिषद काम करत आहे. बिघडत चाललेली हिंदू कौटुंबिक व वैवाहिक व्यवस्था सुधारण्यासाठीही काम चालू आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनासाठी विहिंपचा प्रयत्न आहे. शक्ती व भक्तीचे जागरण करणाऱ्या या कार्यात प्रत्येक हिंदूने सहभागी व्हावे.

मोहनबुवा रामदासी म्हणाले, विश्व हिंदू परिषदेचे कार्य हे ईश्वर निर्मित,प्रेरित व ईश्वरानेचे सुरु केलेले कार्य असल्याने गेले ६० वर्ष अखंड हे कार्य सुरु आहे. देव, देश व धर्मासे अधिष्ठान असल्याशिवाय कोणतीही संघटना व कार्य असे अखंडितपणे टिकत नाही, हे विश्व हिंदू परिषदेने सिद्ध केले आहे. अयोध्येत श्रीराम मंदिर उभारणीची संकल्पपूर्ती झाली आहे. हे राम राज्य टिकवण्यासाठी तुमची आमची जबाबदारी आहे. देव, देश व हिंदू धर्माचे कार्य करणारे जर संकटात असतील तर त्यांच्यासाठी धावून जाणे हे आपले कर्त्तव्यच आहे, असे सांगून समर्थ रामदासांनी ४०० वर्षांपूर्वी जे विचार मांडले त्यानुसार हे धर्माचे कार्य चालू असल्याचे दाखले दिले.

राजाभाऊ कोठारी म्हणाले संपूर्ण मानवी जीवन हे धर्मासाठी विशुद्ध परिषद सर्वात अगोदर पुढे आली आहे. अनेक प्रश्न व समस्यांना समस्यांवर मात करत विश्व हिंदू परिषदेचा आज मोठा वटवृक्ष झाला आहे. हिंदू धर्मावर आज सर्व बाजूंनी आक्रमणे अत्याचार होत आहेत. जर आज हिंदू जागा नाही झाल्यास उद्याचे भवितव्य अंधारमय आहे. त्यामुळे सर्व हिंदूंनी भगव्या झेंड्याखाली एकत्र यावे, असे आव्हान त्यांनी केले.

यावेळी माधवदास राठी महाराज यांनी विश्व हिंदू परिषदेचे सात वर्षातील वाटचालीचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक सचदेव यांनी केले. प्रस्तावित कुणाल भंडारी यांनी केले. जिल्हा मंत्री अनिल जोशी यांनी आभार मानले.

यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा कार्यवाह हिरामंत रामदासी, बजरंग दलाचे क्षेत्रिय संयोजक विवेक कुलकर्णी, अण्णा पंडित, धनाजी शिंदे, आशुतोष लांडगे, वसंत लोढा, दिलीप सातपुते, वसंत सिंग, विष्णू तवले आदी उपस्थित होते.

बूथ हॉस्पिटलमध्ये साल्व्हेशन आर्मीच्या भारतामधील स्थापना दिनानिमित्त

१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबरपर्यंत मोफत दंत तपासणी शिबीर

नगर – साल्वेशन आर्मी इव्हॅन्जेलिन बूथ हॉस्पिटलमध्ये साल्व्हेशन आर्मीच्या भारतामधील स्थापना दिनाचे औचित्य साधून मोफत दंत विकार तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

दंत विकार ही समस्या बहुतेकांना आहेत, महागडे उपचार सर्व साधारण लोकांना परवरडणारे नसल्यामुळे अनेक जण उपचार घेthे टाळतात यास्तव बूथ हॉस्पिटलने ८५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ३० सप्टेंबर पर्यंत मोफत दंत तपासणी शिबीर आयोजित केली आहे.

सुसज्ज दंत यंत्रणा उपलब्ध असलेल्या बूथ हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी आलेल्या रुग्णांकडून कोणतीही डॉक्टर तपासणी फी आकारली नाही.

या शिबिरामध्ये पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या डॉ. ममता कांबळे (दंतरोग चिकित्सक) (वेळ ९ ते १) या वेळेत उपलब्ध असून तपासणी करणार असल्याची महिती बुथ हॉस्पिटल प्रशासक मेजर देवदान कळळुंके यांनी दिली. तसेच आर्थोडॉन्टिस्ट डॉ. राजलक्ष्मी राय, लहान लेकरांच्या दातांचे डॉक्टर डॉ. आशिष रवराळे, प्रॉस्थोडॉन्टिस्ट डॉ. सुरोजित दत्ता, एन्डोडॉन्टिस्ट डॉ. पूजा गायकवाड, ओरल सर्जन डॉ. राहुल आनंद हेही विशेष दंत चिकित्सक म्हणून उपचार करणार आहेत.

या शिबिरामध्ये दातांची तपासणी मोफत आहे व तसेच दातासंबंधी सुचवलेल्या प्रक्रिया अगदी अल्प दरात पुढील प्रमाणे आहेत. डिजिटल एक्सरे (Digital x-ray) १००/– रूट कॅनल फक्त (Root canal) १०००–२०००/–, अल्ट्रासोनिक मशीन ने दात साफ करणे (scaling) ४००/–, मेटल कॅप (Metal cap) ९००/–, सिरॅमिक कॅप (Ceramic cap) १४००/–, दातांची कवळी बसवणे (3 types of Dentures) ६०००, ९०००, १२०००/– दातांच्या रंगाचे सिमेंट भरणे (cement filing) १०० ते ४००/–, तसेच पुढे व मागे आलेले दात सरळ करणे, दात काढणे, लहान लेकरांच्या दातांवरील सर्व उपचार ही उपलब्ध आहे. या शिबिराचा रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन बुथ हॉस्पिटल प्रशासनाने केले आहे.

संपर्क:०२४१–२३४५०५९,८७८०४३९४३, ब्र. प्रविण साबळे ९२७००७०८४६, ब्र. सचिन पंडित ९६२३९८९९८८, ब्र. अमित पठारे ८१७५३७२२५४ पत्ता जनरल पोस्ट ऑफिस समोर जूने कलेक्टर ऑफिस रोड स्टेट बँक चौक अहमदनगर.

नगर शहरात सकल नाभिक समाजाच्यावतीने श्री संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळा मिरवणुक काढण्यात आली. याप्रसंगी आ.संग्राम जगताप, बाळासाहेब भुजबळ, ज्ञानेश्वर गायकवाड, अनिल निकम, अनिल औटी, बाबुराव तापकेपे आदी. (छाया – विजय मते)

नगर शहरात श्री संत सेना महाराजांची पुण्यतिथी सोहळा साजरा

नगर – सकल नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी सेना महाराजांची पुण्यतिथी सोहळा नगर शहरात समस्त बांधवांनी उत्साहात साजरा केला.

नगर शहरातील पानसरे गल्लीत नगरकर नाभिक पंचाचा वाडा येथे श्री संत सेना महाराजांच्या मूर्तीस सकाळी अभिषेक करण्यात आला. महापूजा झाल्यानंतर भव्य–दिव्य रथातून श्री संत सेना महाराजाची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणूकीत तालयोगी पथकाने ढोल, ताश्याचा निनादाने रंगत आणली. भजनी मंडळाने मिरवणूकीत सहभाग घेतला. पानसरेगल्ली, अर्बन बँक चौक, मिंगारवाला चौक, कापडबाजार, तेलीखुंट, नेता सुभाष चौक, नवीपेठ मार्गे मिरवणूक काढण्यात आली. चौकाचौकात श्री संत सेना महाराज यांच्या पालखी, रथाचे पूजन करण्यात आली. दर्शनासाठी गर्दी झाली होती. सुवासिनींनी फुलांची उधळण करुन फुगडी व फेर धरले.

आ.संग्राम जगताप यांनी कापड बाजार येथे मिरवणुकीत सहभागी होऊन नाभिक बांधवांना शुभेच्छा दिल्या. मिरवणुकीत सहभागी वाद्य पथकाचे कौतुक केले. यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, अनिल औटी, सुधाकर काशिद, ज्ञानेश्वर गायकवाड, प्रभाकर सांळुके, बाबुराव तापकेपे, श्रीपाद वाघमारे, निलेश पवळे, विशाल सैदाणे, अनिल निकम, आरकेश सांळुके,अक्षिष ताकपेरे, संदिप शिंदे, दिपक काशिद, ललित मदने, जय वाघ, संतोष जाधव, संतोष शिंदे, सुशिल थोरात, संतोष यादव, बबन काशिद, सागर सांळुके, दिपक बिडवे, शुभम राऊत, ओंकार राऊत, अक्षय शिंदे, सौरभ शिंदे, महेश शिंदे, सागर शिंदे, विजय राऊत, जवाहर भुजबळ, ओंकार भुजबळ, रमेश बिडवे आदींसह महिला उपस्थित हाते.

दुपारी आरती करण्यात आली. महाप्रसादाने पुण्यतिथी सोहळ्याची सांगता करण्यात आली. या सोहळ्यास नगर शहर सावेडी उपनगर परिसरातील समस्त नाभिक समाज, कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

एसटी महामंडळातून २५ वर्षे विना अपघात सेवा देणाऱ्या जिल्ह्यातील चालक विठ्ठलराव जगताप व पठारे यांचा सत्कार करताना बलभिम कुबडे.

महामंडळात २५ वर्षे विनाअपघात सेवा देणाऱ्या नगर जिल्ह्यातील दोन एसटीचालकांचा गौरव

कर्मचाऱ्यांचे प्रश्न न सुटल्यास प्रत्येक विभागात आंदोलन करण्याची तयारी

नगर – राज्य परिवहन सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या (महाराष्ट्र) वतीने २५ वर्षे विना अपघात सेवा देणाऱ्या जिल्ह्यातील दोन चालकांचा गौरव पुणे येथे झाले. २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन चालकांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

पुणे येथे राज्य परिवहन निवृत कर्मचारी संघटनेची महाराष्ट्र पातळीवरील केंद्रीय सदस्याची मिटीग झाली. यामध्ये विना अपघात सेवा देणाऱ्या चालकांचा सन्मान करुन एसटी कर्मचाऱ्यांचा विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. श्रीगोंदा आगारातील एसटीचालक विठ्ठलराव जगताप तर जामखेड आगारातील पठाडे यांनी २५ वर्षे विना अपघात सेवा दिली दिल्याबद्दल त्यांचा सन्मान सोहळा यावेळी पार पडला. या कार्यक्रमासाठी नगर विभागातर्फे केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे यांच्यासह राज्याचे पदाधिकारी व केंद्रीय कमिटी सदस्य उपस्थित होते.

संघटनेकडून महामंडळाशी सेवानिवृत्त कामगारांच्या समस्यांवर व प्रलंबित प्रश्नावर सकारात्मक चर्चा करण्यात आली आहे. पुढील कारवाईसाठी मुख्यमंत्री व परिवहनमंत्री एकनाथ शिंदे यांचेशी चर्चा होणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. तर चर्चेतून मार्ग न निघाल्यास संघटनेच्या प्रत्येक विभागात जिल्हाधिकारी कार्यालया पुढे आंदोलन करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

एसटी महामंडळाचा होलारा चालक–वाहकांमुळे उभा आहे. त्यांचे प्रश्न सुटणे आवश्यक आहे. या बैठकीत अहमदनगर विभागातील प्रश्नावर देखील चर्चा करण्यात आली. विशेषत: पेन्शनबाबत विलंब व आर्थिक प्रश्न मांडण्यात आले. वेळेत प्रश्नावर तोडगा न निघाल्यास विभाग कार्यालय अहमदनगर येथे उपोषण करण्याची तयारी संघटनेच्या वतीने करण्यात आली असल्याची माहिती बलभीम कुबडे यांनी दिली.

अहमदनगर – मनमाड महामार्गाच्या दुरुस्तीसाठी ८.८५ कोटी रुपयांचा निधी मंजूर : खा. निलेश लंके

नगर – दिर्घकाळ प्रतिक्षा असलेल्या नगर–मनमाड रस्त्याची रखडलेली दुरुस्ती अखेर मार्गी लागणार केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ८ कोटी ८५ लाख रूपयांचा निधी यांनी मंजुर झाला असल्याची माहिती खा. निलेश लंके यांनी दिली. दरम्यान या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात आले असून लवकरच या रस्त्याच्या कामासाठी नव्या ठेकेदाराची नियुक्ती करण्यात येणार असल्याचेही खा. लंके यांनी सांगितले.

शिर्डीकडे जाणाऱ्या या रस्त्याच्या कामासाठी निविदा मंजुर झाल्यानंतर ३८ टक्के कमी दराने ठेकेदाराने हे काम घेतले होते. त्यामुळे हे काम अनेक वर्षे प्रलंबित राहिले. रस्त्याच्या कामाच्या मागणीसाठी अनेकदा आंदोलने होऊनही हा प्रश्न मार्गी लागला नाही. लोकसभा निवडणूकीनंतर नगर दक्षिण मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके हे विजयी झाल्यानंतर त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची २२ जून रोजी भेट घेऊन नगर–मनमाड रस्त्याच्या दुरावस्थेकडे लक्ष वेधले होते.

मंत्री गडकरी यांनी खा. लंके यांच्या या मागणीची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन संबंधित ठेकेदारास निलंबित करून नव्या ठेकेदाराची नियुक्ती करण्याच्या सुचना दिल्या होत्या. मंत्री गडकरी यांच्या आदेशानुसार जुन्या ठेकेदारास निलंबित करण्यात येऊन नव्या ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. नव्याने काम सुरु होईपर्यंत या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ८ कोटी ८५ लाख रूपयांचा निधी १० जुलै रोजी मंजुर करण्यात आला. १८ जुलै रोजी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून जय हिंद बिल्डर्स या एजन्सीला काम देण्यात आले असून लवकरच या कामास प्रारंभ होईल असे खासदार लंके यांनी सांगितले.

मुळा उजव्या कालव्याची कामे ताकाळ करा

मुळा प्रकल्पांतर्गत मुळा उजवा कालव्याचा महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत प्रथमच समावेश झाला असून निधीचीही तरतुद झाली आहे. क्षेत्रीय स्थरावर त्यासंदर्भातील काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. वरीष्ठ कार्यालयाकडून ही त्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. विधानसभा निवडणूकीपूर्वी या कामांची निविदा कार्यवाही पूर्ण करण्यात यावी अशी मागणीही जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिवांकडे पत्राद्वारे केली असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

राष्ट्रीय लघुउद्योग दिनानिमित्त व्यावसायिकांकरिता १ सप्टेंबर रोजी कार्यशाळेचे आयोजन

नगर – राष्ट्रीय लघुउद्योग दिनाचे औचित्य साधून ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन आणि मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि ॲग्रीकल्चर यांच्या संयुक्त विद्यमाने व्यावसायिकांसाठी १ सप्टेंबर रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेच्या उद्योजिका शिल्पा सोमणी यांनी सांगितले.

मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्सचा गेल्या ८० वर्षांहून अधिक वर्षांत महाराष्ट्रात मराठी उद्योजक घडविण्यात सिंहाचा वाटा आहे. महिला उद्योजिकांना प्राधान्याने सहकार्य केले जाते.

नवीन उद्योगांना आणि व्यावसायिकांना विविध कागदपत्रांची पूर्तता करायी लागते तसेच भविष्यात मिळणाऱ्या शासन सवलती, व्यावसायिक समीकरणांकरिता मार्गदर्शनाची आवश्यकता असते, हे ओळखून ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क वेल्फेअर असोसिएशनने, मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स सोबत या कार्यशाळेचे आयोजन केले आहे, असे स्नेहल धर्माधिकारी यांनी सांगितले.

या कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून आमी संघटनेचे उपाध्यक्ष महेश इंदाणी, माजी अध्यक्ष राजेंद्र कटारिया, माजी उपाध्यक्ष संजय बंदिष्टी उपस्थित राहणार असून, त्यांचेही मार्गदर्शन या निमित्ताने मिळणार असल्याचे अमित परंडकर यांनी सांगितलेली.

ही कार्यशाळा सर्व व्यावसायिकांकरिता निःशुल्क असून नवीन व्यावसायिक, विद्यमान उद्योजकांना व्यवसायवृद्धीसाठी या कार्यशाळेचा उपयोग होणार असल्याचे उमेश भालेराव यांनी सांगितले. या कार्यशाळेसाठी जागा मर्यादित असल्याने नावनोंदणी आवश्यक आहे.

अधिक माहितीकरिता ९८२२३ ३३८८८, ९८८१३७०८१३, ९४२२२२४८८४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे संस्थेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात स्वच्छ व समर्थ भारत अभियान

स्वच्छता हीच देश सेवा हे ब्रीद घेऊन के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात स्वच्छ व समर्थ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी स्वच्छता मोहिमेबद्दल विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले तर प्रा. चव्हाण सविता यांनी स्वच्छता अभियानाची भूमिका स्पष्ट केली. या अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व जाणून घेऊन प्रत्यक्ष कृतीतून त्याची अंमलबजावणी केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. स्वाती मुनोत, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला. या स्वच्छता अभियानातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटले. प्रा.डॉ. वर्षा कीर्तने यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

सिद्धोड, छ. संभाजीनगर – वरणगाव येथील रहिवासी जैन समाजातील श्रावक जीवन ताराचंद देडीया यांच्या ४१ दिवसांच्या उपवासाचे आयोजन करण्यात आले होते. या मुहूर्तावर आचार्य आनंदऋषीजी यांचे सुशिष्य पद्मऋषीजी ठाणे ३ यांच्या उपस्थितीत तपश्चर्येची पध्मवस्त्रावणी झाली. ही पध्मवस्त्रावणीचा धार्मिक कार्यक्रम जैन स्थानक, तिलकनगर, सिद्धोड येथे २६ ऑगस्ट रोजी सकाळी प्रवचनानंतर झाला. स्नेहाचंद कर्नावट आणि त्यांच्या परिवाराने यावसंगी सर्व धार्मिक बंधू भगिनींना आमंत्रित केले आणि त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

नगरच्या नागापूर औद्योगिक वसाहतीतील कराचीवाला बंधू संचलित टाटा मोटर्स येथे कंपनीच्या नव्याने उत्पादित केलेल्या कर्व्ह –ई.व्ही. या इलेक्ट्रीकल पहिल्या चारचाकी गाडीचे अनावरण माजी आ. अरुण जगताप व आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी संचालक प्रभू व निखिल कराचीवाला उपस्थित होते.

दहावी बोर्ड परिक्षेच्या गुणवत्ता यादीत राज्यात चमकलेल्या रात्र प्रशालेच्या विद्यार्थ्यांचा सन्मान

भाई सख्था नाईट हायस्कूलच्या चार विद्यार्थ्यांचा समावेश; रूपाली बिल्ला ठरली रात्र प्रशालेतून राज्यात प्रथम

नगर – हिंद सेवा मंडळ संचलित भाई सख्था नाईट हायस्कूलच्या इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेत मासूम संस्थेने जाहीर केलेल्या राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकलेल्या रात्र शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. भाई सख्था नाईट हायस्कूलमध्ये झालेल्या गुणगौरव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, रात्र शाळेचे प्राचार्य सुनील सुसरे उपस्थित होते.

१० वी बोर्डात रात्र प्रशालेच्या गुणवत्ता यादीत राज्यात चमकलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करताना हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक आदी.

प्रास्ताविकात डॉ. पारस कोठारी म्हणाले की, रात्र शाळेच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबाबतची कार्य करणाऱ्या मासूम संस्थेच्या वतीने दरवर्षी राज्यातील रात्र शाळेतील दहा गुणवंत विद्यार्थी निवडले जातात, यामध्ये चार विद्यार्थी आपल्या रात्र प्रशालेचे असून, हे सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे. सर्वात मोठी रात्रप्रशाळा म्हणून या शाळेने मासूम संस्थेच्या मूल्यांकनात प्रथम स्थान मिळविले असून, अद्यावत शिक्षण व उच्शिक्षित शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाहुण्यांच्या हस्ते मासूम संस्थेने जाहीर केलेल्या इयत्ता दहावी बोर्डात राज्याच्या गुणवत्ता यादीत रात्र प्रशालेमध्ये राज्यात प्रथम आलेली रूपाली बिल्ला, राज्यात चौथी शारदा मंगलपेझी, राज्यात पाचवा चेतन घोडके व राज्यात नववा वैष्णवी जोशी या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. शैलेंद्र घाष्टे मुंबई यांच्याकडून रूपाली बिल्ला हिला रोख स्वरूपात १५०० रुपये व शारदा मंगलपेझी हिला १००० रुपये बक्षिस स्वरूपात देण्यात आले. योगिता गावकरे समाजअभ्यास विषयात राज्यात प्रथम, शारदा मंगलपेझी विज्ञान विषयात राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शैलेंद्र घाष्टे मुंबई यांच्याकडून प्रत्येकी एक हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले.

मार्गदर्शक शिक्षक गजेंद्र गाडगीळ व शिवप्रसाद शिंदे यांना देखील स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तर यावेळी शाळेत प्रवेशित विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनाने बसविण्यात आलेल्या तक्रार पेटीचे अनावरण करण्यात आले. तक्रार निवारण समिती व सखी सावित्री समितीच्या माध्यमातून प्राप्त तक्रारींचे निवारण केले जाणार आहे.

शिरीष मोडक म्हणाले की, भाई सख्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या यशाला तोड नाही. विद्यार्थ्यांनी बिकट परिस्थितीत वाट काढून यश मिळवले आहे. राज्यातील रात्र शाळेच्या प्रथम दहा मध्ये चार विद्यार्थी व विषय दोन विद्यार्थी प्रथम येण्याचा बहुमान संस्थेच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. पुढील वर्षी यापेक्षा अधिक विद्यार्थी राज्यात चमकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ॲड. अनंत फडणीस म्हणाले की, दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे यश उल्लेखनीय आहे. रात्रशाळेच्या माध्यमातून अनेकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. यापुढेही विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे, शिक्षण थांबवू नका, उच्चशिक्षणासाठी संस्था पाठिशी असल्याचे अभिवचन त्यांनी दिले.

अजित बोरा यांनी मासूम संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाचे कौतुक करून, त्यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीचे या यशातून दीपा झाले आहे. जबाबदाऱ्या सांभाळून विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश समाजापुढे जाण्याची गरज असल्याचे सांगितले.

यावेळी रूपाली बिल्ला, शारदा मंगलपेझी, योगिता गावकरे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून रात्र शाळेत शिक्षणाची संधी व जीवनाची वाट सापडली आहे. तर शिक्षणाबरोबर पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन मिळाल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद पवार यांनी केले. आभार महादेव राऊत यांनी मानले. गुणवंत विद्यार्थ्यांचे मासूम संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, एस.एस. सी. प्रमुख शशिकांत गवस, गुरुप्रसाद पाटील, संदीप सूर्यवंशी, संस्थेचे मानद सचिव संजय जोशी आदी संचालकांनी प्राचार्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी शिवप्रसाद शिंदे, गजेंद्र गाडगीळ, अमोल कदम, उज्वला साठे, वैशाली दुराफे, संदेश पिपाडा, मंगेश भुते, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, अशोक शिंदे, स्वाती होले, अनुराधा गायके, संदीप कुलकर्णी, अनिरुद्ध कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर व विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त 'आर्यभट्ट इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स ॲंड सायन्सेस' या संस्थेकडून स्पेस एक्स्पो चे आयोजन करण्यात आले होते. छाया चित्रात आर्यभट्ट इंस्टीट्युटचे डायरेक्टर हेमंत केदारे व विद्यार्थी.

अंतराळ दिनानिमित्त 'स्पेस एक्स्पो'चे आयोजन

नगर – राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त 'आर्यभट्ट इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स ॲण्ड सायन्सेस' या संस्थेकडून स्पेस एक्स्पोचे आयोजन करण्यात आले होते. महर्षी चितांबर विद्या मंदिर येथे झालेल्या या स्पेस एक्स्पोमध्ये शेकडो विद्यार्थी सहभागी झाले. आर्यभट्ट इंस्टीट्युटचे डायरेक्टर हेमंत केदारे हे इसरो स्पेस टयूटर तर आहेतच, शिवाय नासाचे स्पेस ॲप लोकल लीड देखील आहेत! त्यामुळे, हे एक्स्पो भरवण्यामागचा त्यांचा अभ्यासपूर्ण दृष्टिकोन विद्यार्थ्यांना फायद्याचा ठरला.

निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, विज्ञान प्रकल्प, अंतराळविषयक प्रश्नमंजुषा स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले होते. या एक्स्पोच्या आयोजनात इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता व त्यानिं उभारलेल्या कॉस्मिक कॅफेने कार्यक्रमाला चारचाँद लावले. पेटपूजा करत सर्वांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. भन्नाट कल्पनांनी भरलेले हे एक्स्पो अतिशय सुंदर वैज्ञानिक आविष्कारांचा खजिना ठरले. अशा अनेक नवविध उपक्रमांचे आयोजन करणारी आर्यभट्ट इन्स्टिट्यूट (AIMS) ही अहमदनगर जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे.

या कार्यक्रमास महर्षी चितांबर विद्या मंदिरच्या प्राचार्य सौ. विभावरी रोकडे मॅडम, आध्यापक प्रशांत कुलकर्णी सर, सुकन्या फणसाळकर व एम्सच्या कु. वैष्णवी नागवानी यांचे सहकार्य लाभले व अनेकांनी हजेरी लावली.

अभिनेत्री केतकी माटेगावकरची हॉटेल पॅराडाईजला भेट

अभिनेत्री केतकी माटेगावकर हिने हॉटेल पॅराडाईजला भेट दिली असता तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेविका सौ. सुवर्णा जाधव, सावेरी सत्रे, स्नेहल जाधव, मंगल जाधव, अंजली जाधव, मानसी जाधव, पुजा सत्रे आदी.

बाळासाहेब बोराटेंचे नाव चुकून प्रकाशित झाले

दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्यावतीने खुलासा

नगर – ३० ऑगस्ट ते २ सप्टेंबर रोजी होणारी पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेच्या प्रसिद्धीसाठी दरवर्षी नगर शहरात जाहिरात फलक तसेच वृत्तपत्राच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जाहिरात प्रसिद्ध करण्यात येते. दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्यावतीने २८ ऑगस्ट रोजी अंकात प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये प्रतिष्ठानचे महासचिव बाळासाहेब भुजबळ यांचा फोटो व नाव प्रकाशित करण्याचे होते. परंतु नजरचुकीने माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांचा फोटो व नाव प्रकाशित झाले. दरवर्षीप्रमाणे होणाऱ्या पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेच्या जाहिराती संदर्भात बाळासाहेब बोराटे यांचा काहीही संबंध नसून चुकून त्यांचे नाव प्रकाशित झाले आहे.

याबाबत दिलगिरी व्यक्त करीत आहोत, अशी माहिती पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे व महासचिव बाळासाहेब भुजबळ यांनी दिली आहे.

चर्मकार विकास संघाध्या शहर जिल्हाध्क्षपदी विनोद कांबळे

चर्मकार विकास संघाध्या अहमदनगर शहर जिल्हाध्यक्षपदी विनोद कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली. आ. संग्राम जगताप व चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांच्या हस्ते कांबळे यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सकल माळी समाज ट्रस्टतर्फे १ सप्टेंबरला नगरमध्ये मोफत चिकणगुणिया तपासणी व औषधे वाटप शिबीर

नगर – सध्या नगर शहरात चिकनगुनिया या आजाराची साथ मोठ्या प्रमाणात सुरू आहे. चिकनगुनिया एन्स्टी मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. यामुळे राजयोग फाऊंडेशन आणि सकल माळी समाज ट्रस्ट अ.नगर यांच्या संयुक्त विद्यमाने टिळक रोड येथील पडोळे चाळ येथे माळी वधू वर नोंदणी कार्यालयात येथे मोफत अस्थिरोग तपासणी शिबीराचे आयोजन १ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते २ यावेळेत मोफत चिकणगुणिया तपासणी व औषधे वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात डॉ.रणजीत सत्रे व राजयोग क्लिनिकच्या संचालिका डॉ. योगिता सत्रे व डॉ.जगदिश निंबाळकर रुग्णांची तपासणी करणार आहेत.

नोंदणी आवश्यक, प्रथम येणाऱ्या १०० रुग्णांची प्राथान्याने तपासणी केली जाईल. कृपया आपले जुने रिपोर्ट घेवुन यावे. या शिबिराचा माळी समाज बांधवांनी, भगिनींनी तसेच नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे यांनी केले आहे. माहिती व नाव नोंदणी मो.नं. +९१ ७२७६७ ००००, ७०५७७२९८३६.

डॉ.पाऊलबुधे विद्यालयात सखी सावित्रीसमितीचे गठन

नगर – राज्यातील शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर सखी सावित्री समिती गठन करणेबाबत शासन निर्णयानुसार वसंत टेकडी येथील डॉ. ना. ज. पाऊलबुधे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सभा घेण्यात आली.

वसंत टेकडी येथील डॉ. पाऊलबुधे विद्यालयात सावित्री समिती गठण करणेबाबत सभा घेण्यात आली. याप्रसंगी मुला मुलींच्या सुरक्षितता बाबत मार्गदर्शन करताना प्रा. आशा गावडे. समवेत प्राचार्या डॉ. रेखाराणी खुराणा, डॉ. मंजिरी कुलकर्णी, माजी नगरसेविका संध्या पवार, शिक्षक विद्यार्थी आदी. (छाया – विजय मते)

या सभेसाठी प्राचार्य डॉ.रेखाराणी खुराणा, सचिव नाना देशमुख, खजिनदार प्रा. दादासाहेब भोईटे, प्राचार्य भरत बिडवे, डॉ. मंजिरी कुलकर्णी, माजी नगरसेविका सौ.संध्याताई पवार, प्रा.भारती थोरवे, प्रा.क्रांती घोडके, अंगणवाडी सेविका चिप्पा राजश्री, प्राचार्या सुचित्रा डावरे, पालक सदस्य खजिनदार प्रा.दादासाहेब भोईटे यांनी समितीचा मुख्य उद्देश व विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणकोणत्या प्रकारची कार्यवाही करावी याबद्दल माहिती सांगितली. डॉ.मंजिरी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांमध्ये विवेकाचा भाव कसा निमार्ण करता येईल या विषयी मार्गदर्शन केले.

यावेळी प्राचार्या डॉ.खुराणा यांनी विद्यार्थ्यांचा शारिरीक, मानसिक व भावनिक विकास घेण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न केले जावेत अशी सूचना केली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली वैष्णवी इंगळे, प्रेम पवार, कार्तिकी मुळीक, आदित्य रासकर यांनी आपल्या मनोगतातून भावना व्यक्त केल्या.

शुभांगी ढाकणे, महिला पोलिस मायश्री भिटे हे उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा.अर्चना कडौले यांनी केले तर आभार प्राचार्य भरत बिडवे यांनी मानले.

तेलगू चित्रपट अभिनेता देव गिल यांना राजयोगाची पुस्तके देण्यात आली भेट

३० ऑगस्ट रोजी हिंदी सह ५ भाषेत प्रदर्शित होणाऱ्या अहो विक्रमार्क चित्रपटातील मुख्य अभिनेता तेलगू अभिनेता देव गिल यांना १४३ देशात शिकविल्या जाणाऱ्या प्राचीन राजयोगाची पुस्तके प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांनी भेट दिली.

गुलमोहर रोड येथे द डी पिझ्झा रेस्टॉरंटचा शुभारंभ

नगर – पिझ्झासह इटालियन थाळी व विविध खाद्य पदार्थांचा आस्वाद देण्यासाठी गुलमोहर रोड येथे द डी पिझ्झा रेस्टॉरंटचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. यावेळी घर घर लंगर सेवेचे जनक आहुजा, हरजीतसिंह वधवा, राजेश जग्गी, गौरव फिरोदिया, प्रमोद कांबळे, रेस्टॉरंटचे संचालक जस्मितसिंह वधवा, महेश काळे, हरीश तावरे, डॉ. संजय असनानी, डॉ. अमित बडवे, प्रशांत मुनोत, जवाहरे नगरवाला, जीतू गंभीर, मनिषकौर वधवा, सनी वधवा आदी उपस्थित होते.

गुलमोहर रोड येथे द डी पिझ्झा रेस्टॉरन्टचा शुभारंभ करताना आ. संग्राम जगताप. समवेत जसमितसिंग वधवा आदी.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, मुंबई, पुणेच्या धर्तीवर शहरात हॉटेल, रेस्टॉरंट संस्कृती झपाट्याने वाढत आहे. कुटुंब घराबाहेर पडून हॉटेल, रेस्टॉरंटचा आस्वाद घेताना दिसतात. युवक-युवतींचा रेस्टॉरंटकडे कल अधिक वाढत आहे. हॉटेल, रेस्टॉरंटच्या व्यवसायाने अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. द डी पिझ्झाचे दर्जेदार फास्टफुडचे खाद्य पदार्थ नगरकरांच्या पसंतीस उतरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गुलमोहर रोड, फिजिक्सवाला कॉम्प्लेक्स येथे झालेल्या द डी पिझ्झा रेस्टॉरंट नगरकरांच्या सेवेत दाखल झाला आहे. या रेस्टॉरंट माध्यमातून सर्व प्रकारचे फास्टफुड व इतर खाद्य उपलब्ध होणार आहे. शहरात प्रथमच इटालियन थाळी या रेस्टॉरंट मध्ये उपलब्ध होणार असल्याची माहिती जस्मितसिंह वधवा, महेश काळे व हरीश तावरे यांनी दिली.

या रेस्टॉरंटला प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, मुन्ना जग्गी, सतीश गंभीर आदींनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

उपनगरात नवनिर्वाचित भटके विमुक्त आघाडीच्या सचिवपदी सुमित बटूळे यांची निवड झाल्याबद्दल श्रीराम चौक जेष्ठ नागरीकांनी त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. (छाया – विजय मते)

तरुणांनी ज्येष्ठांना आधार देण्याची गरज

महांडुळे सर यांचे प्रतिपादन; श्रीराम चौक ज्येष्ठ नागरिकांकडून सुमित बटूळे यांचा सन्मान

नगर – आजची तरुणापिढी उच्च शिक्षण घेऊन नोकरीसाठी कुटूंबापासून दूर जात आहेत आई-वडील देखील मुलांच्या भविष्याशाठी त्यांना चांगले शिक्षण देत आहेत. हिच मुले करियरला महत्व देताना नोकरीसाठी परराज्यात, परदेशात सोयी शोधतात पण घरातील वृद्ध, आई-वडीलांना वेळ देउ शकत नाही. अशा वेळी तरुणांनी जेष्ठांना आधार देण्याची खरी गरज आहे, अशी खंत ज्येष्ठ शिक्षक महांडुळे यांनी व्यक्त केले.

यावेळी उपनगरात नवनिर्वाचित भटके विमुक्त आघाडीच्या सचिवपदी सुमित बटूळे यांची निवड झाली. यानिमित्ते श्रीराम चौक ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. याप्रसंगी हरिभाऊ महांडुळे, भागवत नागरगोजे, विक्रम गुंजाळ, मधुकर वाळूंजकर, मुरलीधर बटूळे, साहेबराव वांढेकर, सिताराम गोरे, सुभाष दारकुंडे, जनप्रभाष आदमाने, संजय खेले, सखाराम नाईकवाडे, जगन्नाथ वाघ, कचरु आव्हाड, सुभाष खरपुडे, प्रभाकर तांबडे, सदाशिव पिसे, बाबासाहेब केदार, भोजिबा गोल्हार, अशोक आंधळे, रमेश शिदोरे, गहिनीनाथ नाकाडे, रामचंद्र चव्हाण, बारगजे आदी उपस्थित होते.

श्री. महांडुळे सर यांनी जेष्ठ नागरीकांच्या अडचणी यावेळी सांगितल्या. घरात एकटेपण घालविणे खुप कठीण असते. ज्या वेळी आपल्याला मुले जवळ असावी असे वाटते त्या वेळी ती जवळ नसतात. मग चौकात बसून सर्व ज्येष्ठ मंडळी एकत्र येतात वेळ घाणविण्यासाठी कौटुंबिक गप्पा रंगतात. यावेळी प्रत्येकाला मुलांची आठवण येते. असे सांगितले.

यावेळी उपनगरात सुमित बटूळे याने भाजपाच्या माध्यम तून चांगली कामे केली त्यामुळे त्याला महाराष्ट्र प्रदेश भटके विमुक्त आघाडीचे सचिवपद मिळाले हि आम्हाला भुषणावह बाब आहे. त्याचा सन्मान करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्याने त्यांच्या हातून जेष्ठ नागरीकांसाठी शासकीयस्तरावर ज्या योजना आहेत त्या यशस्वीपणे राबवाव्यात, असे मधुकर वाळूंजकर यांनी सांगितले.

या सन्मानामुळे मला चांगले पाठबळ मिळाले ज्येष्ठांचा आशिर्वाद लाभला, अशी भावना सुमित बटूळे याने व्यक्त केली.

'पद्मशाली सोशल फाऊंडेशन' तर्फे २ सप्टेंबर रोजी महाप्रसाद वाटप

नगर – पद्मशाली सोशल फाऊंडेशन ट्रस्टच्यावतीने शेवट श्रावणी सोमवार निमित्त २ सप्टेंबर रोजी सायं. ७.३० वाजता श्री मार्कंडेय मंदिर, महामुनी चौक, गांधी मैदान, नगर येथे महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.महाप्रसादाचे हे ६ वे वर्ष असून त्यानिमित्ताने सायं. ७ वाजता महर्षी श्री मार्कंडेय महामुनी मंदिरात अभिषेक, आरती करण्यात येणार आहेत. महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. यावर्षी महाप्रसादामध्ये भात, वरण (दालचा) व शिरा ठेवण्यात येणार असून या महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पद्मशाली सोशल फाऊंडेशन ट्रस्टच्यावतीने करण्यात आले

पद्मशाली समाजातील पदवीधारकांचा १४ सप्टेंबर रोजी सत्कार समारंभ

नगर – गुरुवर्य पोटयन्ना बत्तिन शैक्षणिक, सामाजिक मंडळ यांच्या वतीने साळाबादप्रमाणे १४ सप्टेंबर रोजी सायं. ५ वाजता सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या पदवी, पदविका व पदव्युत्तर धारकांचा सत्कार समारंभ होणार आहे.

समाजातील सर्व पदवीधारकांनी मोबाईल क्रमांकावर किंवा मंडळाच्या पदाधिका-यांकडे संपर्क साधुन प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रतीसह आपली नावे नोंदवावीत असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण सिद्दम, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गंगाराम् व सचिव प्रा. बाळकृष्ण गोटीपामुल यांनी केले आहे. माहितीसाठी शंकरराव नक्का– ९८६०८४७९८४ (पापय्या गल्ली), नारायण एक्कलदेवी– ९४२३७५०९८४ (दातरणे मळा), मारुती अरकल– ९८५०२२९९३१ (वसंतटेकडी, सावेडी) यांच्याशी संपर्क साधवा.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

आढळला ब्रह्मांडकालीन कार्बनचा ढग

जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने आता ब्रह्मांडाच्या पहाटेच्या काळात जीवसृष्टीसाठीच्या मूलभूत घटकाचा छडा लावला आहे. ब्रह्मांडाच्या प्रारंभीच्या काळातील पहिल्यावहिल्या आकाशगंगांचे निरीक्षण करीत असतानाच या अंतराळ दुर्बिणीने कार्बनचा छडा लावला. ज्या आकाशगंगेत कार्बन आढळले ती बिग बँग नंतर अवघ्या ३५० दशलक्ष वर्षांनंतर बनली होती. बिग बँग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या महाविस्फोटानंतरच ब्रह्मांडाची निर्मिती झाली, असे मानले जाते. या संशोधनावरून हे दिसून आले की, जीवसृष्टीचा प्रारंभही आधीच्या अनुमानापेक्षा पुष्कळच लवकर सुरू झाला. त्यामुळे याबाबतच्या सध्याच्या प्रचलित धारणा बदलणार आहेत.



या दुरस्थ आणि छोट्या आकाशगंगेत कार्बनचा ढग आढळला आहे. ब्रह्मांडातील हायड्रोजनखेरीज आणखी एका प्रारंभिक मूलद्रव्याचा यानिमित्ताने शोध लागला आहे. 'अँस्टॉनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यासाठी स्वीकारली गेली आहे. केम्ब्रिज युनिव्हर्सिटीचे संशोधक रॉबर्टो मैओलिनो यांनी याबाबतचे संशोधन केले. त्यांनी सांगितले, यापूर्वीच्या संशोधनांनंतर असे दिसले होते की, कार्बनची मोठ्या प्रमाणात निर्मिती फार उशिरा सुरू झाली. ती बिग बँग नंतर तब्बल एक अब्ज वर्षांनंतर सुरू झाल्याची प्रचलित धारणा होती; मात्र आता आम्हाला आढळले की, कार्बनची निर्मिती बरीच आधी झाली आहे. कदाचित कार्बन हा जगातील सर्वात जुना धातूही ठरू शकतो. हायड्रोजन आणि हेलियमपेक्षा जड असलेल्या मूलद्रव्यांचे वर्गीकरण धातूमध्ये करण्यात येत असते. जीएस-झेड या आकाशगंगेच्या निरीक्षणावेळी जेम्स वेब अंतराळ दुर्बिणीला हा कार्बनचा ढग आढळला.

एक डोंगर... चक्क कपड्यांचा

नैसर्गिक डोंगरांशी स्पर्धा करणारे अनेक प्रकारचे डिगारे पहायला मिळत असतात. त्यामध्ये कचऱ्याच्या डिगाऱ्यापासून ते बाटल्या, प्लास्टिक वस्तूंच्या डिगाऱ्यापर्यंत अनेक वस्तूंचा समावेश होतो. चिलीमध्ये असा चक्क कपड्यांचा डिगारा आहे, जो एखाद्या डोंगराशी स्पर्धा करतो!

आतापर्यंत तुम्ही कपड्यांचा बाजार पाहिला असेल. जिथे विविध रंगाचे, विविध कंपन्यांचे लेटेस्ट ट्रेंडिंग फॅशनेबल कपडे मिळतात. पण, या डोंगरावर जगातील सर्वात महागड्या कंपन्यांचे कपडे देखील फुकट मिळतात. या डोंगरावर तुम्हाला अगदी लुईस विटॉनपासून टॉम फोर्डपर्यंत तुम्ही म्हणाल त्या ब्रँडचे कपडे असे जमिनीवर पडलेले मिळतात. या कपड्यांच्या डोंगराचा अवकाशातून काढलेला फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पण, प्रश्न असा आहे, हा इतका मोठा डोंगर तयार कोणी केला? आज बाजारात तुम्हाला विविध प्रकारचे कपडे पाहायला मिळतात. कपड्यांचा ट्रेंड हा सतत बदलत असतो.

आज तुम्ही ठरावीक प्रकारचे कपडे घालताय, पण आठवडाभरात तो ट्रेंड जाऊन नवीनच ट्रेंड येईल. मग लोकं त्या प्रकारचे कपडे घालू लागतात. पण, या सतत बदलणाऱ्या ट्रेंडमुळे हल्ली टाकावू कपड्यांचं प्रमाण कमालीचं वाढलं आहे. ट्रेंड गेला की लोकं एखाद्या फॅशनच्या कपड्यांकडे ढुंकूनही पाहात नाहीत. मग अशा कपड्यांचं करायचं काय, असा मोठा प्रश्न बहुतांशी देशांना पडू लागला. अन्? यावर उपाय म्हणून लोकांनी चिलीमधील अटाकामा वाळवंटात हे कपडे फेकण्यास सुरुवात केली. सुरुवातीला दक्षिण अमेरिकेतील कही देश या ठिकाणी कपडे फेकत होते.

पण, हळूहळू उत्तर अमेरिका आणि आता तर युरोपमधील देशही मोठमोठ्या गाड्यांमधून कपडे भरून आणतात आणि या वाळवंटामध्ये फेकून देतात. परिणामी, गेल्या काही काळात या वाळवंटात वाळू ऐवजी आता कपड्यांचे डोंगर दिसू लागले आहेत. या डोंगरांमध्ये तुम्हाला किल्येक ब्रँडेड कंपन्यांचे कपडे पाहायला मिळतील. ज्या कपड्यांसाठी लोकं हजारो रुपये मोजतात, ते कपडे इथे कचऱ्यासारखे पडलेले आहेत. जर एखाद्याने या डोंगरांमध्ये जाऊन थोडी शोधाशोध केली, तर त्याला एकापेक्षा एक भारी कपडे अगदी फुकट मिळतील. अलीकडेच एका फॅशन ब्रँडने या भंगार कपड्यांपासून लेटेस्ट फॅशनेबल ड्रेस तयार केले होते. अन्? हे ड्रेस परिधान करून मोठमोठ्या मॉडेल्सनं रॅम्पवॉक केलं होतं.

शरीराच्या अंतर्गत थंडाव्यासाठी...

पावसाळा सुरू झालेला असला, तरी उकाडा कमी झालेला नाही. अशा वेळी नारळ पाणी, लिंबू पाणी यासारख्या गोष्टींचे सेवन करणे फायदेशीर ठरते. यामुळे शरीर हायड्रेट राहते आणि शरीराला थंडावाही मिळतो. मात्र, अन्यही काही पदार्थ आहेत, ज्यांचे सेवन अशा वेळी लाभदायक ठरते. या पदार्थांची प्रकृती थंड असते. यामुळे तुमचे शरीर दीर्घकाळ थंड राहते. शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी देखील हे प्रभावी ठरू शकते, असे तज्ज्ञ सांगतात.

सब्जा बियाणे : सब्जाच्या बियांमध्ये थंडावा असतो, त्यामुळे शरीर आणि मन दोन्ही थंड ठेवण्यासाठी ते प्रभावी आहे. सब्जाच्या बियांचे नियमित सेवन केल्याने तुम्ही तुमची पचनशक्ती देखील वाढवू शकता. अपचन आणि बद्धकोष्ठतेच्या समस्यांपासूनही आराम मिळतो.

गुलकंद : गुलकंदची प्रकृती थंड आहे आणि ते अनेक प्रकारच्या ॲंटिऑक्सिडंटस्नी समृद्ध आहे. यामध्ये प्रोबायोटिक्स आढळतात, जे पचनासाठी खूप चांगले मानले जाते. एवढेच नाही, तर शरीरातील घाण काढून टाकण्यासाठी तुम्ही गुलकंदचे सेवन करू शकता.

पुदिना : पुदिन्याच्या पानांचा थंड प्रभाव असतो. हे शरीराचे तापमान नियंत्रित करते. शरीर थंड ठेवण्यासाठी तुम्ही पुदिन्याच्या पानांचे सेवन करू शकता. यामुळे उन्हाळ्यात डोकेदुखीचा त्रास कमी होऊ शकतो. याशिवाय मायग्रेनपासूनही आराम मिळू शकतो.

सातू : सातू किंवा सत्तूच्या पाण्याचा ग्लायसेमिक इंडेक्स खूपच कमी असतो. यामुळे शरीरातील इन्सुलिन नियंत्रित राहण्यास मदत होते. उन्हाळ्यात सत्तूचे पाणी पिणे खूप फायदेशीर ठरू शकते. जर तुम्हाला साखरेची पातळी नियंत्रित ठेवायची असेल तसेच उन्हाळ्यात तुमचे शरीर थंड ठेवायचे असेल, तर तुम्ही सत्तूच्या पाण्याचे सेवन करू शकता.

चिकनपासून आईस्क्रीम!

सध्या उकाड्याने देशभरात नवे नवे विक्रम करण्याचा जणू चंगच बांधला आहे. अशा वेळी थंडगार आईस्क्रीमचे सेवन करणे कुणाला आवडणार नाही? मात्र, हल्ली पयुजन्च्या नावाखाली आणि सोशल मीडियात प्रसिद्धी मिळवण्यासाठी आईस्क्रीमचेही भन्नाट प्रकार आले आहेत. कोणी मिरचीचं आईस्क्रीम बनवतेय, तर कोणी टोमॅटोचं, कोणी नूडल्सची कुल्फी बनवतंय, तर कुणी छोले पराठ्याचं आईस्क्रीम. पण, हे सगळे पदार्थ कमी होते म्हणून की काय आता बाजारात एक नवं आईस्क्रीम आले आहे. या पदार्थाला चिकन तंदुरी आईस्क्रीम असे म्हटले जाते. होय, हे आईस्क्रीम चक्क चिकनपासून तयार केले जाते. हा अनोखा पदार्थ पाहून खरंच तुम्ही सुद्धा डोक्यावला हातच लावाल!

हे आईस्क्रीम कसे तयार केले जाते, याचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल झाला आहे. त्यामधून दिसले की सर्वात आधी तंदुरी चिकन घेतलं. मग त्याचे बारीक तुकडे केले जातात. मग या तुकड्यांमध्ये दूध मिसळून (अय्यो!) चिकनचा लगदा तयार केला जातो. या लगद्यावर चॉको चिप्स आणि चॉकलेट सिरप टाकलं आणि मग हे मिश्रण एकजीव करून बर्फाच्या लादीवर पसरवलं. अन्? त्यानंतर काही वेळातच हे मिश्रण गोठून तयार झालं चिकन तंदुरी आईस्क्रीम. हे अजब आईस्क्रीम एका ट्विटर अकाऊंटवरून शेअर करण्यात आलं आहे. हा व्हिडीओ आतापर्यंत १० हजारांपेक्षा अधिक नेटकऱ्यांनी पाहिला असून, जळजळास सर्वांनीच त्यावर जोरदार टीका केली आहे. कोणी म्हणतेय, आईस्क्रीमवर असे अत्याचार करणं थांबवा, तर कोणी या गुन्ह्यासाठी देव तुम्हाला कठोर शिक्षा देईल अशी फिरकी घेतेय!

निएंडरथल-होमो सेपियन्स

आधुनिक मानवाचा विकास हा होमो सेपियन्स या मनुष्यप्रजातीपासून झाला असे मानले जाते. मात्र, होमो सेपियन्स ही एकच मनुष्य प्रजाती अस्तित्वात होती, असे नाही. निएंडरथलसारख्या अन्यही काही मानव प्रजाती अस्तित्वात होत्या, ज्या कालौघात नामशेष झाल्या. मात्र, निएंडरथल व होमो सेपियन्स मानवामध्ये संपर्क निर्माण होऊन दोन्ही प्रजातींचा संकरही झाला होता. त्यामुळे सध्या मानवात या दोन्हीच्या खुणा आढळतात. आता संशोधकांनी म्हटले आहे की, ४७ हजार वर्षांपूर्वी निएंडरथल व होमो सेपियन्स मानवांमध्ये संबंध आला आणि तो सुमारे ७ हजार वर्षे कायम होता.



प्रागैतिहासिक काळातील तसेच आधुनिक मानवातील डीएनएच्या विश्लेषणानंतर संशोधकांनी याबाबतचे निष्कर्ष काढले आहेत. त्यामध्ये असे आढळले की, मानवामध्ये निएंडरथलची जनुके दिसण्यास ४७ हजार वर्षांपूर्वी सुरुवात झाली व ती ६८०० वर्षे सुरू राहिली. निएंडरथल हे आधुनिक मानवाचे म्हणजेच होमो सेपियन्सचे सर्वात जवळचे नातेवाईक होते. दोन्ही प्रजातींचे पूर्वज सुमारे पाच लाख वर्षांपूर्वी वेगळे झाले होते. आफ्रिकेतून बाहेर पडलेल्या आधुनिक मानवाशी निएंडरथल मानव प्रजातीचा संकर झाला, ही बाब दहा वर्षांपूर्वीच सिद्ध झाली होती.

सध्या आफ्रिकेबाहेरील आधुनिक मानवाच्या जीनोममध्ये १ ते २ टक्के निएंडरथल डीएनए आहेत. या डीएनएचा आधुनिक मानवाच्या जीनोममध्ये कधी प्रवेश झाला, हे अजूनही नेमकेपणाने सांगता येत नाही. दोन्ही प्रजातींचा संकर कुठे व कधी झाला, की वेगवेगळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या काळी झाला, हे स्पष्ट नाही. हे कोडे उलगडण्यासाठी संशोधकांनी गेल्या ४५ हजार वर्षांच्या काळातील ३०० आधुनिक मानवांच्या जीनोमचे विश्लेषण केले. त्यामधून हे नवे संशोधन करण्यात आले.

कंडक्टरकृपेने वाचला!

कधी कधी अतिशय अनपेक्षितरीत्या एखाद्याचा जीव वाचत असतो. त्यासाठी काही माणसंच कारणीभूत होत असतात. कमालीचे प्रसंगावधान आणि चपळ हालचाली यासाठी कारणीभूत ठरतात. अशीच एक घटना केरळमध्ये घडली असून, त्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. हा व्हायरल व्हिडीओ केरळमधील एका बसमधील आहे. बसमधून तोल जाऊन पडणाऱ्या तरुणाचे प्राण या कंडक्टरने थक्क करणाऱ्या चपळ हालचालीने वाचवले आहेत. ही घटना इतकी आश्चर्यकारक आहे, जी पाहून डोळ्यांवर विश्वास बसणार नाही.

व्हायरल व्हिडीओमध्ये दिसते की, एक बस सुसाट वेगाने रस्त्यावरून धावत आहे. कंडक्टर दरवाजाजवळील सीटला टेकून उभा आहे आणि दरवाजासमोर उभ्या असलेल्या प्रवाशांचे तिकीट काढत आहे. तो तिकीट काढत असताना अचानक ड्रायव्हरने ब्रेक दाबल्याने दरवाज्यात उभ्या असलेल्या तरुणाचा तोल जातो आणि तो बसमधून खाली पडणार असतो; पण बस कंडक्टर पटकन त्याचा हात धरून ओढून घेतो. तरुणाला कंडक्टरने वेळीच हात दिल्यामुळे तो बसच्या बाहेर पडत नाही.

कंडक्टरच्या मदतीने तो पुन्हा बसमध्ये नीट उभा राहतो. कंडक्टरच्या प्रसंगावधानामुळे तरुणाचा जीव वाचतो; पण हे सर्व इतक्या पटकन घडते की नक्की काय घडले, कोणालाही समजत नाही. व्हिडीओमध्ये कंडक्टरकडे पाहिले, तर तो नेहमीप्रमाणे काम करत आहे आणि तरुणाला अत्यंत सहजपणे हात देतो. तरुणाला हात देताना कंडक्टर साधे मागे वळूनही बघत नाही. जणू त्याला माहीत होते, की आता तो पडणार आहे. हे दृश्य एखाद्या चित्रपटातील (विशेषतः रजनीकांतच्या!) असल्यासारखे वाटते. कंडक्टरने हस्तक्षेप केला नसता, तर बसच्या चाकाखाली प्रवासी तरुण चिरडला गेला असता. एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या व्हिडीओला ३,०७,००० व्ह्यूज मिळाले आहेत. पोस्टबरोबर ट्विटमध्ये असे लिहिले आहे की, ''केरळच्या २५ या इंद्रिय असलेल्या बस कंडक्टरने एका व्यक्तीला बसमधून पडण्यापासून वाचवले.'' अनेक लोक या कंडक्टरची चपलाई पाहून त्याला स्पायडरमॅन म्हणत आहेत!

अस्वलाची दिमाखदार स्वारी

शोले मधील ये दोस्ती हम नहीं तोडेंगे मधील गाण्यात जय आणि वीरू जशा जोड बाईकवरून जात असताना दिसतात, तशा बाईकच्या जयऐवजी चक्क अस्वल ऐटीत बसलेले दिसले तर? असाच प्रकार रशियातील एका रस्त्यावर पाहायला मिळाला. या बाईकवरून चक्क एक अस्वल नेले जात होते आणि तेही या राईडचा आनंद घेत हातवारे करीत होते!

सोशल मीडियावर सतत विविध प्रकारचे व्हिडीओ व्हायरल होत असतात. यापैकी काही व्हिडीओ पाहून खरंच अवाक? व्हायला होतं. असाच हा एक मंमतीशीर व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये तुम्ही एक अस्वल पाहू शकता, जे बाईकवर बसून एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवास करतेय. पण, लक्षवेधी बाब म्हणजे हे अस्वल जणू एखाद्या राजकीय नेत्यासारखी ऐट दाखवतेय. हा व्हिडीओ पाहून अनेकांना हबू आवरले नाही. इंटरनेटवर चर्चेत असलेल्या या अस्वलाचं नाव टिम असं आहे. हे ५१३ किलोचं अस्वल बाईकवर बसून रशियातील आर्कान्जेस्क शहरात फिरताना दिसतेय.

लक्षवेधी बाब हे अस्वल रस्त्यावर चालणाऱ्या लोकांना एखाद्या नेत्यासारखं हातवारे करीत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांमधील लोक त्याला हात मिळवतायेत. अन्? अस्वल देखील त्यांना अभिवादन करतेय. हा ५५ सेकंदांचा व्हिडीओ इंटरनेटवर जोरदार व्हायरल होत असून, गेल्या काही तासांत १८ कोटींपेक्षा अधिक नेटकऱ्यांनी पाहिला आहे. हे अस्वल जणू एखाद्या नेत्यासारखी ऐट दाखवतंय. जणू ते निवडणुकीला उभे राहिलेय आणि लोकांना मतदान करण्याचं आवाहन करतंय.



चीनलाही आढळले चंद्रावर पाणी

भारताच्या चंद्रयान-१ या मोहिमेत चंद्रावरील पाण्याचा छडा लागला होता. आता चीनच्या चांगी-५ यानातलेही चंद्रावर पाण्याचे अस्तित्व शोधले आहे. चीनी वैज्ञानिकांनी चंद्राच्या मातीत पाण्याच्या अणूंचा शोध घेतला आहे. २०२० मध्ये चीनच्या चांगी-५ किंवा चांग-ई ५ मोहिमेत चंद्रावरील मातीचे हे नमुने पृथ्वीवर आणण्यात आले होते. या संशोधनामुळे चंद्र कोरडाठाक आहे, अशी जी दीर्घकाळा पासूनची धारणा होती, ती चुकीची ठरली आहे. नासाने दीर्घकाळापासून चंद्रावर पाणी नसल्याचेच सांगितले होते.

अनेक दशकांपूर्वी अमेरिकेच्या अपोलो मोहिमांमधून अंतराळवीरांनी चंद्रावरील खडक-मातीचे नमुने पृथ्वीवर आणले होते. मात्र, त्यामध्ये पाण्याचे संकेत मिळाले नसल्याचे सांगण्यात येत होते. त्यामुळे वैज्ञानिकांनी निष्कर्ष काढला होता की, चंद्रावरील माती पूर्णपणे कोरडी आहे. २००९ मध्ये भारताच्या चांद्रयान-१ या मोहिमेत चंद्रावरील हायड्रेटेड खनिजांच्या संकेतांचा छडा लावला होता. चंद्राच्या सूर्यप्रकाशातील भागात पाण्याचे अणू असल्याचे संकेत त्यावेळी मिळाले होते. हे एक महत्त्वाचे संशोधन होते; पण २०२० पर्यंत नासाने इन्फारेड अॅस्ट्रॉनॉमी (सोफिया) साठी स्ट्रेटोस्फेरिक वेधशाळेतून मिळालेल्या डेटाचा उपयोग करून चंद्राच्या अशा भागात पाण्याच्या शोधाची घोषणा केली नव्हती. हा निष्कर्ष प्रामुख्याने रिमोट सेन्सिंग आणि मायक्रोॲनालिसिस तंत्रावर आधारित होता, ज्यामध्ये हे समजले होते की, पाणी हायड्रोजन आणि ऑक्सिजन अणूंच्या रूपात अस्तित्वात असू शकते. चीनच्या चांगी-५ ने २०२० मध्ये चंद्राच्या निकटवर्तीय भागातून नमुने गोळा केले होते. त्यामध्ये आता पाण्याचे अस्तित्व दिसून आले आहे. बीजिंग नॅशनल लॅबोरेटरी फॉर कंडेन्स्ड मॅटर फिजिक्स तसेच इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स ऑफ द चायनीज ॲकेडमी ऑफ सायन्सेज च्या वैज्ञानिकांनी याबाबतचे संशोधन केले आहे. त्याची माहिती नेचर ॲस्ट्रॉनॉमी या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. संशोधकांनी एक हजारपेक्षा अधिक खनिज क्लॅस्टना वेगळे केले. त्यामध्ये एक प्लेटसारखा पारदर्शक क्रिस्टल होते, ज्याला अज्ञात चंद्र खनिज (यूलएम-१ असे नाव देण्यात आले. त्यामध्ये पाण्याचे अणू होते.

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

जन्म मृत्युच्या फेऱ्यात मनुष्याच्या दृष्टीने, धर्म काय द्विप आहे, गति आहे आणि उत्तम शरण आहे. धर्माची शक्ति ही जीवनाची सर्वात मोठी शक्ति होय. धर्मामुळे सर्वांचे जीवन सुखी होते, म्हणूनच धर्माला आत्मसात करणे गरजेचे आहे. दान, शील, तप आणि साधना या प्रकारे धर्माची आराधना केली पाहिजे, आणि जर या चारी तत्वाला आत्मसात केले तर आपल्या जीवनाचे कल्याण होईल. जर आपण चार तत्वाला ग्रहण करू शकलो नाही तर किमान एक तर तत्व स्विकार करून आत्म कल्याण होईल.

ज्याच्या जीवनात दान नाही, तो नादान आहे. दानचा अर्थ मोह. त्यात जीवनात आपल्याला देण्याचे संस्कार नसेल तर दान होऊ शकत नाही आणि ज्याने मनमुराद दान केले, त्याचे नाव इतिहासात सुवर्णअक्षरात अजरामर झाले. याला अनुसरुन एक पौराणिक कथा आहे.

देवलोकामध्ये गुरुब्रह्मदेवाने सर्व देवांना भोजनासाठी आमंत्रित केले व ब्रह्मदेवाने सर्व देवांना भोजन वाढले. परंतु एक अट ठेवली, भोजन करताना आपला हात कोपऱ्याने वाकवू नये. यावर काही देवांना फार राग आला. हात न वाकवताना भोजन कसे करणार? काही देवांनी विचार केला, जर ब्रह्मदेवानी अशी अट ठेवली तर यामागे काही तरी तथ्य नक्कीच असणार. त्यांनी विचार केला आणि जेवणाचे ताट मध्यभागी ठेवून देव समोरासमोर बसले आणि त्या ताटातून घास घेऊन एक दुसऱ्यास भोजन घास भरवू लागले. तर या अटीचा अर्थ एकच होता, प्रथम दुसऱ्याला खावू द्यावा. नंतर आपण खा. ज्यांची देण्याची भावना आहे म्हणूनच तो देव आहे, आणि ज्यांची फक्त घेण्याची भावना आहे तो दानव आहे.

सांगण्याचे तात्पर्य असे की, आपण धर्माची आराधना करता करता जीवन सुखमय समाधान कस शकतो.

– सौ. सविता चोरडिया

शहरातील रस्त्यांबाबतच्या दर्जाकडे विशेष लक्ष द्या

आरोग्याचा प्रश्न गंभीर, डेंग्यू रुग्ण संख्येत वाढ, कचऱ्याचे ढिगाऱ्यासह विविध प्रश्नांवर भाजप शिष्टमंडळाची मनपा आयुक्तांशी चर्चा

नगर – सणासुदीचे दिवस जवळ येत असून शहरांमध्ये आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून डेंग्यूचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे, कचऱ्याचे ढीग ठिकठिकाणी दिसत असून घाणीचे साम्राज्य पसरले आहे, घरोघरी घंटागाडी वेळेवर येत नाही, मोकाट जनावरे, मोकाट कुत्रे, विस्कळीत पाणीपुरवठा आदी विविध प्रश्नांमुळे नागरिक त्रस्त आहेत, शहरांमध्ये खड्डध्याचे साम्राज्य असून ते सणासुदीच्या आधी बुजवावे तसेच शहरात सुरू असलेल्या रस्त्याबाबतच्या दर्जाकडे विशेष लक्ष देऊन दर्जेदार रस्ते निर्माण करावी. यापूर्वी एचाच रस्त्यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला असून नागरिकांच्या पैशाचा दुरुपयोग होऊ नये, याकडे विशेष लक्ष द्यावे अशी मागणी भाजप शिष्टमंडळाने आयुक्तांकडे केली. यावर सकारात्मक चर्चा झाली असून आयुक्तांनी ते प्रश्न जातीने लक्ष घालून सोडवावे, अशी मागणी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी केली.

शहरातील विविध प्रश्नांवर आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी चर्चा करताना भाजपचे शिष्टमंडळ. (छाया – लहू दळवी)

शहरातील विविध प्रश्न बाबत भाजप शिष्टमंडळाने आयुक्त यांची भेट घेत चर्चा केली. यावेळी अभय आगरकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी सभागृह नेते रवींद्र बारस्कर, विधानसभा अध्यक्ष महेंद्र गोळे, महिला अध्यक्ष प्रिया जानवे, गीता गिल्हा, माजी नगरसेवक रामदास आंधळे, नितीन शेलार, सचिन पारखे, राजेंद्र सातपुते, दत्ता गाडळकर, बाळासाहेब गायकवाड, बाबासाहेब सानप, बंटी ढापसे, गोपाळ वर्मा, मनोज लाठे, अरुण जिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते

मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी आयुक्तांशी चर्चा झाली असून हा प्रश्न राज्य सरकारकडे प्रलंबित आहे तो सोडवण्यासाठी भाजप पाठपुरावा करेल, मनपा कर्मचारी हे शहरातील महत्त्वाचा घटक असून त्यांच्यामार्फत नागरिकांचे विविध प्रश्न मार्गी लागले जात असतात तरी सातवा वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत, अशी माहिती अभय आगरकर यांनी दिली

आनंदधाम येथे १ सप्टेंबरपासून पर्युषण महापर्व प्रारंभ

नगर – जैन धर्मियांचा चातुर्मास पर्वातील पुण्यार्जन अर्जित करण्याचा अत्यंत प्रभावित क्षण पर्युषण महापर्व या कालावधीत धर्म साधना आराधना जप तप दान करण्याचे विशेष महत्व आहे. राष्ट्रसंत आचार्यसम्राट श्री आनंदऋषिजी म. सा. यांचे स्मृती समाधी स्थळ आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज यांच्या सान्निध्यात आणि चातुर्मास निमित्त विराजमान श्री श्रुतमुनिजी म.सा. आदि ठाणा यांच्या सान्निध्यात ९ सप्टेंबर पासून पर्युषण महापर्व प्रारंभ होत आहे.

१ ते ८ सप्टेंबर दरराेज सकाळी ६.१५.ते ७ प्रार्थना, ८.३० वाजता अंतगढ सुत्र वांचना, ९ ते १०.३० प्रवचन, दुपारी २ वाजता मंगलपाठ, २.१५ ते ३ कल्पसूत्र वांचना, ३ ते ४ शिबीर व सायंकाळी सुर्यास्ता नंतर प्रतिक्रमण होईल. नेहमी प्रमाणे ५ ते १५ वयोगटातील मुलींचे व मुलांचे सायंकालीन प्रतिक्रमण भक्तनिवास होईल. ८ सप्टेंबर रोजी प्रवचना नंतर दुपारी १२ वाजता सामूहिक आलोयना व मंगलपाठ होईल. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता सामूहिक क्षमापना कार्यक्रम होईल.

चातुर्मास अंतर्गत पर्युषण महापर्व सप्ताह निमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमात या अष्टदिवसीय धर्म महोत्सवात धर्मप्रेमी बंधू भगिनींनी लाभ घ्यावा व आपले जीवन कृतार्थ करावे असे श्री अक्षरमुनिजी म. सा. यांनी सांगितले. या सर्व आयोजित धार्मिक कार्यक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

अविनाश पाटील यांचे लंडन येथे तबला वादन

पुणे – तबला वादक अविनाश पाटील यांच्या सोलो तबला वादनाच्या मैफिली युके देशातील लंडन, न्यु कॅसल, रेडिंग तसेच आयर्लंड देशातील डबलीन येथे होणार आहेत. येथील विविध महाराष्ट्र मंडळे, सांकृतिक संस्था यांच्या तर्फे ६ ते १६ सप्टेंबर दरम्यान त्यांच्या तबला वादनाचा मैफलींचे आयोजन करण्यात आले आहे. पाटील यांनी तबला वादनात संगीत अलंकार पदवी व एम. ए .तबला वादनात पुणे विद्यापीठाचे सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

पाटील यांनी तबल्याची तालीम त्यांचे वडील तबला वादक पं. प्रमोद पाटील व दिल्ली घराण्याचे ख्यातनाम तबला वादक पं. उमेश मोघे यांच्याकडे घेतली आहे. अतिशय प्रतिकुल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर प्रचंड संघर्ष व कष्ट करुन त्यांनी स्व–कर्तृत्वावर स्व:ताची वेगळी ओळख संगीत विश्वात निर्माण केली आहे.

पद्मभूषण पं. राजन–साजन मिश्रा यांच्या सारख्या जागतीक ख्यातीच्या अनेक कलाकारांना त्यांनी साथ संगत केली आहे. तसेच सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशात व परदेशात युके, अरब व युरोपीयन देशात आपल्या दमदार तबला वादनाने जगभरातील संगीत रसिकांची दाद मिळवली आहे.

पर्युषण पर्वानिमित्त महेश मंगल कार्यालयात १ ते ७ सप्टेंबर दरम्यान ब्याळूची व्यवस्था

नगर – पावन पर्युषण पर्वानिमित्ताने आत्मशुद्धी व क्षमाभाव वृद्धींगत करणाऱ्या जैन धर्मातील पवित्र अशा महापर्युषणपर्व काळास १ सप्टेंबरपासून सुरुवात होत आहे.

महापर्युषण पर्वानिमित्त १ ते ७ सप्टेंबर दरम्यान सायंकाळी ५ ते ६.३० जैन समाजातील पर्युषण महापर्व काळात मोफत जेवणाची चोवीहार (ब्याळू) ची व्यवस्था महेश मंगल कार्यालय, बन्सी महाराज मिठाईच्या जवळ, रामचंद्र खुंट, नगर येथे करण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी संजय गुगळे (९२२६४५९३२१) यांच्याशी संपर्क साधावा.

चोवीहार (ब्याळू) हाउस

पावन पर्युषण पर्व निमित्त
चोवीहार की व्यवस्था की गई है
रविवार दि. 01/ 09 / 2024 से
शनिवार दि. 07/ 09 / 2024 तक
समय - शाम 5 बजे से 6.30 बजे
स्थान :- महेश मंगल कार्यालय.
बन्सीलाल मिठाई के पास, रामचंद्र खुट, अहमदनगर

आनंद गुरु परिवार

राज्यातील ग्रंथालयांसाठी लवकरच नवे धोरण आणणार

आ. सत्यजित तांबेंचा पुढाकार; प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतली बैठक

नगर – गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील ग्रंथालयांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्क्षतेखाली बैठक पार पडली. आमदार सत्यजीत तांबे यांच्या पुढाकारातून या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत ग्रंथालयांसाठी नवे धोरण तयार करणे, ग्रंथालयांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ करावी व ग्रंथालय वर्ग बदल तसेच नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात यायी या विषयांवर चर्चा करण्यात आली.

हिवाळी अधिवेशनात देखील आमदार सत्यजीत तांबे यांनी राज्यातील ग्रंथालयांच्या प्रलंबित प्रश्न उपस्थित केले होते. परंतु त्यावर अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने बैठकीचे आयोजन करण्याची मागणी त्यांनी केली. ग्रंथालयांचे अनेक वर्षापासून प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासाठी सरकारने लवकरच नवीन धोरण तयार करणे गरजेचे आहे. पुस्तकांच्या वाढत्या किमती, वर्तमानपत्रांचे वाढीव दर, भरमसाठ वीज बिल, इमारत दुरुस्ती खर्च, कर्मचाऱ्यांना तुटपुंजे मानधन आदी बाबींमुळे सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्याची मागणी येथ्या अनेक वर्षांपासून होत आहे.

ग्रंथालयांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासमवेत आयोजित बैठकप्रसंगी आमदार सत्यजित तांबे व अधिकारी.

राज्य शासन या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असून आजअखेर आ. सत्यजीत तांबेंच्या प्रयत्नातून ग्रंथालयांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक घेण्यात आली. बैठकीत ग्रंथालयांच्या प्रश्नांबाबत आणि नवीन धोरण राबवण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती आ. तांबेंनी दिली.

एटीएम कार्डची अदलाबदल करत महिलेची ५० हजारांची फसवणूक

नगर – शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुख्य कार्यालय परिसरात सुरक्षा रक्षक तैनात असतानाही एका धुरत्या चोराने भर दुपारी 'हातसफाई' करत महिलेची ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना गुरुवारी (दि.२९) सकाळी ११.४० च्या सुमारास घडला आहे. वैशाली अशोक सावंत (वय ४२, रा. दीपनगर, भिंगार) असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे.

फिर्यादी सावंत यांचे स्टेट बँक ऑफ इंडियात खाते आहे. त्यांना नुकतेच नवीन एटीएम कार्ड बँकेच्या वतीने देण्यात आले होते. त्या ते कार्ड घेऊन गुरुवारी (दि.२९) सकाळी ११.४० च्या सुमारास जीपीओ चौकात असलेल्या स्टेट बँकेच्या मुख्य कार्यालय परिसरातील एटीएम मशीनमध्ये गेल्या. तेथे नवीन आलेल्या एटीएम कार्डचा पिन त्या जनरेट करत होत्या.

त्यावेळी तेथे अंगात पिवळ्या रंगाचा टी शर्ट, डोळ्यालाा गॉगल लावलेला व तोंडाला निळ्या रंगाचे मास्क लावलेला अनोळखी इसम आला. त्याने फिर्यादी सावंत यांना मी तुमच्या एटीएम कार्डचा पिन जनरेट करून देतो असे म्हणत त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांच्याकडून एटीएम कार्ड घेत पिन जनरेट केला. मात्र एटीएम कार्ड देताना त्याने त्यांचे लक्ष विचलित करत हात चलाखीने दुसरेच कार्ड फिर्यादी सावंत यांच्या हातात दिले व तेथून निघून गेला. काही वेळाने त्या चोरट्याने विविध एटीएम मशीन मधून १० – १० हजार असे ५० हजार रुपये काढून घेत त्यांची फसवणूक केली. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांनी भिंगार कम्प पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली.

या फिर्यादी वरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३१६,३१८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सर्च ऑपरेशन राबवत वॉरंट मधील १० जणांना अटक

एमआयडीसी पोलिसांनी भल्या पहाटे राबविली मोहीम

नगर – वरिष्ठांच्या आदेशाने एमआयडीसी पोलिसांनी गुरूवारी (दि.२९) भल्या पहाटेच सर्च ऑपरेशन राबवून अटक वॉरंट मधील १० आरोपींना अटक केली. तसेच १७ बेलेबल वॉरंट व ३४ न्यायालयीन समन्सची बजावणी केली. पहाटे पाच ते सकाळी आठ यावेळेत ही मोहीम राबविण्यात आली. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी एमआयडीसी हद्दीत सर्च ऑपरेशन राबविण्याचे आदेश एमआयडीसी पोलिसांना दिले होते.

सर्च ऑपरेशन राबवत वॉरंट मधील १० जणांना अटक केल्यानंतर त्यांच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी वेगवेगळी पथके तयार करून गुरुवारी पहाटे पाच ते सकाळी आठ या वेळेत धरपकड करून अटक वॉरंटमधील १० आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले. तसेच १७ बेलेबल वॉरंट व ३४ न्यायालयीन समन्सची बजावणी केली. एमआयडीसी पोलिसांच्या धरपकडमुळे आरोपींची एकच धावपळ उडाली.

पोलिस अधीक्षक राकेश ओला, अप्पर अधीक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीणचे प्रभारी पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, पोलीस उपनिरीक्षक विनोद परदेशी, उपनिरीक्षक विजय जाधव, उपनिरीक्षक मनोज मोंढे, उपनिक्षक अनिल आढाव, अंमलदार महंमद शेख, संदीप घव्हाण, अनिल आव्हाड, फकीर शेख, मुकुंद दुधाळ, मनोज रजपुत, विष्णू भागवत, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, राजेश राठोड, ज्ञानेश्वर तांदळे, गोरक्षनाथ केदार, रवींद्र देशमुख यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

राजकोट किल्ल्यावरील घटनेची नगर शहरात पुनरावृत्ती नको

महापुरुषांचे पुतळे उभारताना महानगरपालिकेने काळजी घ्यावी

नगर – राजकोट किल्ल्यावरील पुतळा उभारण्याचा कामात जसा भ्रष्टाचार दिसून येतो तसा व त्यापेक्षा दुप्पट मागील महानगरपालिकेच्या कामाचा इतिहास पाहता भ्रष्टाचार नगरच्या महापुरुषांच्या पुतळे उभारण्यात होऊ शकतो. त्यामुळे राजकोट किल्ल्यावरील झालेली घटनेची पुनरावृत्ती नगर शहरात नको त्या करिता आपण हे सर्व पुतळे उभारताना काळजी घ्यावी, अशी मागणी नितीन भुतारे यांनी आयुक्तांना निवेदन देऊन केली आहे.

महाराष्ट्रात मालवण येथे राजकोट किल्ल्यावरील छत्रपतींचा पुतळा कोसळला त्यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या. महापुरुषांचे पुतळे उभारताना कुठलाही हलगर्जीपणा समजले पाहिजे

नगर शहरात येणाऱ्या काळात प्रोफेसर चौक येथे छत्रपती संभाजी महाराजांचा, मार्केट यार्ड चौकात डॉ. महामानव बाबासाहेब आंबेडकर यांचा, माळीवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. तर एसटी स्टँड चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा मोठा पुतळा उभारण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने हे पुतळे उभारताना योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे.

जी पुतळे उभारण्यात येणार आहे त्यांना कला संचालनालय यांची परवानगी घेतली का? हे पाहणे गरजेचे आहे. महानगरपालिकेच्या होता कामा नये हे प्रशासनाला टाळावीच्या राजकारणात काम देणाऱ्या ठेकेदाराला पुतळे बसविण्याचा अनुभव आहे का? अनुभवी ठेकेदाराला हे काम देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्यात पुतळे उभारताना कला संचालनालय यांची परवानगी घ्यावी लागते. त्यांना एक मॉडेल सादर करावे लागते. त्यानंतर त्याला मान्यता मिळते.

ह्या सर्व बाबी पूर्ण झाल्या का नाही हे आयुक्त यांनी पहावे, असे निवेदन नितीन भुतारे यांनी महानगरपालिका आयुक्त यांना दिले आहे.

'मालवन' घटनेचा निषेध करुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक

भविष्यात अशा घटना घडल्यास मनसे स्टाईलने आंदोलन करणार : रस्ते आस्थापना जिल्हाध्यक्ष इंजिनिअर विनोद काकडे यांचा इशारा

नगर – छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहे. ३५० वर्षापूर्वी त्यांनी बांधलेले गडकिल्ले अजूनही उभे आहेत. परंतु आज सरकारने त्यांचा पुतळा उभारला आणि तो पाच सहा महिन्यात कोसळतो, हे अत्यंत दुर्दैवी आहे. त्यांनी आपल्याला स्वच्छ कारभार करायला शिकवलं, राज्यात आज सत्तेवर बसलेले सरकार हे भ्रष्टाचार करुन निकृष्ट दर्जाचे काम करत आहे, त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला आहे. अशा घटना पुन्हा होणार नाही यासाठी सरकारने लक्ष देऊन काम करावे. अशी घटना पुन्हा घडली तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना संपूर्ण देशभर मनसे स्टाईल आंदोलन उभारेल, अशा इशारा रस्ते आस्थापना जिल्हाध्यक्ष विनोद काकडे दिला आहे.

मालवन येथील झालेली घटना अत्यंत दुर्दैवी असून त्या घटनेचा मनसेच्यावतीने निषेध करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला.

मालवन येथील झालेली घटना अत्यंत दुर्दैवी असून त्या घटनेचा मनसेच्यावतीने निषेध करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, रस्ते आस्थापना विनोद काकडे, जिल्हाउपाध्यक्ष मनोज राऊत, शहराध्यक्ष गजेंद्र राऊत, शहरसचिव डॉ.संतोष साळवे, विद्यार्थी सेना राज्यउपाध्यक्ष सुमित वर्मा, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायवकाड, वाहतूक सेना शहराध्यक्ष अशोक दातरंगे, शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे, दिपक दांगट, महेश चव्हाण आदि उपस्थित होते.

यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ म्हणाले कि, छत्रपतींचा पुतळा कोसळने हि मोठी दुर्दैवी घटना आहे. राज्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रपुरुषांचे पुतळे बसविण्यात आले आहे, त्यांचे ऑडीट होणे गरजेचे आहे. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी राज्यसरकाराने कठोर पावले उचलावी, अशी मागणी डफळ यांनी केली.

दोन महिन्यांसाठी मिळाला पोलीस उपनिरीक्षक होण्याचा मान

नगर – पोलिस दलातून सेवानिवृत्त होण्यासाठी अवघा २ महिन्यांचा कालावधी शिल्लक असताना सहाय्यक फौजदार असलेले बाबासाहेब गुंजाळ यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाली आहे. अवघ्या २ महिन्यासाठी का होईना हा मान मिळाल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

२ महिन्यांसाठी मिळाला पोलीस उपनिरीक्षक होण्याचा मान मिळाल्याबद्दल बाबासाहेब गुंजाळ यांचा सत्कार करताना गृह विभागाचे पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर व इतर अधिकारी.

पोलिस अधिक्षक राकेश ओला यांचे आदेशाने शुक्रवारी (दि.२९) पोलीस मुख्यालय मध्ये सहायक फौजदार ते पोलिस उपनिरीक्षक असे पोलीस आमलदार यांची पदोन्नती झाल्याने सर्वांचा सत्कार कार्यक्रम गृह विभागाचे पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मोटार परिवहनचे पोलीस निरीक्षक पाटील, पोलीस मुख्यालय येथील राखीव पो.नि. परदेशी यांनी मुख्यालय येथे फौजदार पदावर नियुक्त असलेले बाबासाहेब गुंजाळ हे २ महिन्यानंतर ते निवृत्त होणार आहेत. त्यांना २ महिन्यासाठी पोलिस उपनिरीक्षक पदावर काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी बाबासाहेब गुंजाळ यांनी समाधान व्यक्त करत पदोन्नती दिल्याबद्दल पोलीस अधीक्षक राकेश ओला व अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उपाधीक्षक गृह हरीश खेडकर यांना धन्यवाद दिले. यावेळी पोलीस मुख्यालय येथील कंपनी चालक पो.हे.कॉ. कृष्णा वैरागर, मंगेश काळे, राजेंद्र कदम, स.फौ. मुसा, पो.कॉ. अमोल वारे आदी उपस्थित होते.

नवीन शोरूम भाड्याने देणे
(१३५० स्क्वे.फूट आणि १८ फूट हाईट)
कपड्याचे शोरूम, इलेक्ट्रॉनिक शॉप, गिफ्ट आर्टिकल शोरूमसाठी उपयुक्त.
कुष्ठधाम रोड,सावेडी, अ.नगर
9119922177, 7796099890

2 BHK फ्लॅट भाड्याने/विकणे
व्यंकटेश फेज, राजवीर हॉटेलजवळ तपोवन रोड,अ.नगर
9156659303
(एजंट क्षमस्व)

न्यु काऊंटर विकणे आहे
७ फुटी काऊंटर
किराणा दुकान, जनरल स्टोअर्स बेकरी, डेअरीसाठी उपयुक्त
9096933179

पाहिजेत
रेडीमेड कपड्याच्या दुकानात हेल्पर - १
सेल्समन - १
अनुभवीस प्राधान्य
प्रत्येक समक्ष भेटा
पेठनवाडी चौक सायं.7.00 ते 8.00
स्वरा मध्ये...
स्वरा फॅशन
करंजीगोरीज, नालबंद खूट, अ.नगर

पाहिजेत
ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे.
ज्योती प्रिंटर्स
पत्रा : गांधी मैदान, मार्केटच्या शेजारील समोर, अ.नगर
9766297774

प्लायवुड/हार्डवेअर शोरूमसाठी पाहिजेत
मॅनेजर : ०२
रिसेप्शनिस्ट : ०१ (महिला/पुरूष)
अकाऊंटंट : ०१ (महिला/पुरूष)
सत्यम हार्डवेअर
जुना बाजार, अ.नगर
9595666000
(वेळ : १०.३० ते ८.००)

रिसेप्शनिस्ट/ओ.टी स्टाफ पाहिजे
पूर्णवेळ/अर्धवेळ
रिसेप्शनिस्ट : पदवीधर
ओटी स्टाफ : ANM/GNM/OT Technician
पगार-अनुभव व शैक्षणिक पात्रतेनुसार
: प्रत्यक्ष भेटा :
श्री नेत्रालय ॲण्ड मॅटर्निटी क्लिनिक, प्रेमदान चौक, नगर
9970661144

शाडू मातीचे गणपती
पेण येथील शुद्ध शाडू मातीचे सजावट केलेले, शाश्वोक्त सात्विक, मनमोहक, देखण्या श्रीमंत गणेशमूर्ती किफायतशीर दरात मिळण्याचे कलादालन
डेकोरेट केलेल्या मूर्ती पाहण्यासाठी अवश्य भेट द्या.
विये आर्ट गॅलरी
बुकिंग चालू आहे
श्री लक्ष्मीनारायण मंदिरा समोर, बागडपट्टी, अ.नगर
मो. 9860222259, 9665022280

2BHK फ्लॅट भाड्याने देणे
पहिला मजला, स्वतंत्र नळ, टाकी, पार्किंग सुविधा
मार्केटयार्ड पाठीमागे, महात्मा फुले चौकाजवळ सारसपुल रोडवर,
9822066381

भावपूर्ण श्रद्धांजली!

जीवनज्योत स्मरते
स्मृती मनात उरते...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!
आमच्या ट्रस्टचे अध्यक्ष
स्व. रामप्रसादजी (बंडू) सोमानी
स्व.दि.१९ अगस्त २०२४
श्री माहेश्वरी पंच ट्रस्ट
विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि सर्व सभासद, अ.नगर

कापड दुकानात कामासाठी पाहिजे
मुले	मुली
०५ जागा	०५ जागा
आकर्षक पगार + कमिशन
- अर्जासह समक्ष भेटणे -
गणपती फॉमिली शॉपी
खिस्त्रत गल्ली, अ.नगर.
9851440444

"Sky is the limit"
Shree Academy's
SHREE GENIUS IT HUB LLP, A'NAGAR
A Software Company has to fill the following posts
Trainer For Programming Languages : 2 Posts
Qualification : BCS, MCS
Mobile : 9822866893

भाडेतत्वावर शॉप उपलब्ध
दिल्लीगेट, न्यु आर्ट्स कॉलेज रोड, अ.नगर येथे भाडेतत्वावर शॉप उपलब्ध
अटॅच बाथरूम, सी.सी.टिव्ही., प्रसन्न वातावरण इ. सुविधांयुक्त
अशी सुवर्णसंधी पुन्हा नाही..
- संपर्क -
Mo. 9270570699

गाळा भाड्याने देणे
माळीवाडा,बसस्टॅण्ड जवळ बुरूडगावरोड,अ.नगर
✻ संपर्क ✻
8888382444
9764752222

|| प्रथम पुण्यस्मरण ||

कै.राजेश सदाशिव सटाणकर
स्व. दि. १३/०८/२०२३
भाग्यवान आम्ही पितृछत्र ऐसे लाभले,
आशीर्वादाने आपल्या जीवन धन्य झाले
अजुनही वाटते तुम्ही सोबत आहात...
पाठीवरूनी हात मायेचा फिरविल आहात....
भावपूर्ण श्रध्दांजली
समस्त सटाणकर परिवार

|| चतुर्थ पुण्यस्मरण ||

स्व. गुलशनकुमार मंगलसेन धुप्पड
स्व. दि. ३०/०८/२०२०
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली...
✻ कु:खांकित ✻
समस्त धुप्पड परिवार
बीरबल दिवानचंद धुप्पड आडते बाजार, अ.नगर.
संजय ऑटोमोबाईल्स माळा नं. ११, रेणमन, राजेंपुल, अ.नगर.
त्रिमुर्ती ऑटोमोबाईल्स सोनानगर चौक, कुष्ठधाम रोड, सावेडी, अ.नगर.

बंगला भाड्याने देणे/विकणे
विद्यानगर, दौंड रोड
प्लॉट एरिया २७५० स्क्वे.फुट
बांधकाम १११० स्क्वे.फुट अंदाजे
सर्व सुविधांनी युक्त
9960612662

बिल्डींग भाड्याने देणे
२५० स्क्वे.फुट तीन हॉल, स्वंतत्र टॉयलेट
अमन पाटील रोड, माळीवाडा
9552525625
9175957007

सेल... सेल... सेल... सेल... सेल... सेल...
योजना
महासेल महामेळावा
इस से सस्ता कही नहीं...
शातु | फॅन्सी डिझायनर साडी
कॉटन सिल्क साडी | कॅटलॉग साडी
प्युअर येवला पैठणी
महिलासाठी रोजगार योजना
घर बसल्या साड्यांचा व्यवसाय करुन कमवा ५ ते ५० हजार महिना तेही मिल रेटमध्ये
मिल टु ग्राहक
SNB MILL
फॅन्सी साडी । कुर्ती । ड्रॉप । लेगिंग्स
8182818220
नगर अर्बन बँक रोड, बोरा ज्वेलर शेजारी, कापड बाजार, अहमदनगर - ४४४ ००१

खरेदीखत गहाळ झालेबाबतची जाहीर प्रगटन
या जाहीर प्रगटन नोटीशीने तमाम लोकांस कळविणेत येते की, **के. आफ्फाबेगम जैनुल आबेदीन अन्सारी यांनी मौजे सावेडी येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं.८४/अ (जुना सर्व्हे नं. ५१अ) मधील प्लॉट नं. २३ यावे एकूण क्षेत्रफळ २४८.८१ चौ. मी. हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत** १) जुबेदा पटवीज अब्दुल रशिद मुझा, २) शफ्फा अशफाक खान, ३) नुजहत मोहम्मद याकुब मुझा यांच्याकडून मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर अनन- १ यांचे कार्यालयातील दस्त नं.९१७/९१ अन्वये खरेदीखताव्दे खरेदी घेतलेले आहे. सदरचे खरेदी केलेला मुळ दस्त गुलमोहर रोड ते पाईपलाईन रोड या परिसरात गहाळ झालेले असून सदर दस्त गहाळ झालयाबाबत संबंधित पोलीसांना पोलीस स्टेशन, अहमदनगर इस गहाळ झाले बाबत कळविलेले आहे व त्याबाबत दिनांक २९/०८/२०२४ रोजी एफ.आय.आर. याचा क्र. १९३७२०२४०७२४०००८५ याप्रमाणे आहे.
तरी सदरचे गहाळ झालेला दस्त हे वर उल्लेख केलेल्या मिळकतीचे असून सदर खरेदी खताचे दस्त कोणास सापडल्यास त्वरीत त्यांचा गैरवापर न करता वर उल्लेख केलेल्या पत्यावर त्वरीत आणुन द्यावे ही नम्र विनंती.
दि. ३०/०८/२०२४.
अहमदनगर.
ॲड. सय्यद अल्फाक अहमद
बी-७, दुजाता अपार्टमेंट, सी. एन. हाईट, युनियन बँक ऑफ इंडिया समोर, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
मो. ९८२२०२४०३८ / ९०२८२२०६१६

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीशीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेला प्लॉट विद्यमान मालक **मेघा सुमित ठळाडे स. जे - ४ ॲपेक्स हॉईटस सी. नंबर पुणे रोड, अहमदनगर** यांचे मालकी वहिवाटीचा आहे. सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार आमचे अशिलांबरोबर कायम्चा पूर्ण करोनी देण्यांचे ठरविले असुन विसारापोटी आमचे अशिलाकडुन रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तरीच सदरची मिळकत निर्वाध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.
परंतु कोणतीही तक्रार राह नये म्हणुन या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही वाद वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी गहाण अन्य कर्ज लिज अथवा अन्य कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून **१५** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट बंदची विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.
परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन - जिल्हा तुळजी अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **केडगांव** येथील बिगरशेती प्लॉटचे वर्णन खालील प्रमाणे.

स.नं.	प्लॉट नं.	चौ.मि.
२१४/क	५	३००.००

या संपूर्ण प्लॉट बाबत.
यांची सद्यहिस्सा :
पुर्वेस - स.नं. २१२
पश्चिमेस - ९.०० मीटर रस्ता
दक्षिणेस - प्लॉट नं. ४ ती
उत्तरेस - प्लॉट नं. ६ ती
दि. ३०/०८/२०२४
अहमदनगर.
ॲड. नागिन्द्र अनुप इन्माईल शेख
ॲड. कुरेशी कैलाश पारकर
कलेक्टर ऑफिस जवळ, झारेकरी, अहमदनगर
मो. ९८८५४१९८८० / ७२७५२५४८८

जाहीर नोटीस
तमाम लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेला मिळकतीबाबत आमचे अशिल राहत सावताहेब पानसरे, रा. सरोवरनगर, मिंगार, अहमदनगर यांनी मिळकतीचे मालक (१) आशाराम धंदाराम गोडसर, रा. घोडनांग, ता. नेवासा, जि. अहमदनगर, (२) हनुमंत धंदाराम गोडसर, रा. घोडनांग, ता. नेवासा, जि. अहमदनगर, (३) परिमाताई साहेबराव मोने, रा. वडण, ता. राहुरी, जि. अहमदनगर, (४) मोहम्मद अंबादास येवले, रा. वडिवाडी, ता. जि. अहमदनगर, (५) नसमाद अंबादास येवले, रा. वडिवाडी, ता. जि. अहमदनगर, (६) बंदकना पंढरीनाथ पवार, रा. चांचवाडी, ता. जि. अहमदनगर, (७) सुरेखा साधु मदगणे, रा. वडगांव गुप्ता, ता. जि. अहमदनगर यांच्या नावन मुळचाच अमित साहेबराव शिंदे, रा. पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर यांच्यासोबत सदर मिळकतीचे साठेखत केलेले आहे. सदर मिळकत ही आमचे अशिलास खरेदी देण्यासंदर्भात अनिल कालिनाथ शिंदे यांनी मोजदी पल्लीक अहमदनगर यांच्या समोर साठेखत दस्त क्रमांक २६/२०२४, दि. ३०/०१/२०२४ रोजी लिहून नोंदवून दिला असून फार मोठी रक्कम आमचे अशिलाकडुन मुळकत्याराम यांनी स्विकारलेली आहे.
मुळत्यारपत्राकरु अनिल कालिनाथ शिंदे हे सदर मिळकत उवरत इतसास दिही करुनच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलाच्या लक्षात आले आहे.
तरी सदर मिळकतीबाबत कोणाची कोणताही करोरी विक्री अगर हस्तांतरचा व्यवहार मुळकत्याराम अनिल कालिनाथ शिंदे यांचेशी करु नये. करले तो आमचे अशिलाच व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही नकसान होऊन ने म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.
परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन - जि.। अहमदनगर राज्य जि.। व ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे सोंडी येथील सोजनमीन मिळकत-

गट नं.	क्षेत्रफळ (हे. आर.)
३८१	५-८३

यापैकी वर अ.क्रेस केलेला विद्यमान मालकांचे मालकीचे समाईकमधील अविभक्त हिस्याची क्षेत्रफळमि दिये क्षेत्र० हे. ३१.७५ आर
यांची सद्यहिस्सा रेकॉर्डप्रमाणे.
वेगेपासचे चतु: सद्यपुर्वेस मिळकत त्याचील झाड झुडुप, दगड माती राह तदंगभुत वस्तुसह नागणुकीचे व वहिवाटीचे हक्कासुदा काही एक राखून न ठेविता.
दिनांक : ३०/०८/२०२४
अहमदनगर
ॲड. रुचिन नोवुल शिन्दे
मिर्लीट कॉलनी, आलमगीर, मिंगार,
अहमदनगर मो.नं. ९८८५४३९९४५

दि अंबिका महिला सहकारी बँक लि., अहमदनगर
वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांकरिता)

दि. अंबिका महिला सहकारी बँकची सन २०२३ २०२४ ची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या अध्यक्षा सौ भारती शशिकांत आठरे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. १४/०९/२०२४ रोजी दु. ३.०० वा. तक्षशी नागयण मंगल कार्यालय, टिळक रोड, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.
सभेपुढील विषय
१) मागील दि. १४/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (उक्त सभेचा वृत्तांत बँकेच्या कार्यालयामधे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.)
२) सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील स्वभंडेसा ज्या बाबींवर जास्त खर्च झाला आहे त्याची नोंद घेऊन अंदाज पत्रकातील स्वभंडेसा जास्त खर्चास मंजुरी देणे तसेच सन २०२४-२०२५ या वर्षा करता सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सादर केलेल सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचा ३७ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेला हिशोब ३१ मार्च २०२४ अखेरचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
४) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि. ३१/०३/२०२४ अखेरच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०२३-२०२४ या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या तपासणी अहवालाची नोंद घेऊन तो स्वीकृत करणे.
६) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष - दुरुस्ती अहवालाची नोंद घेऊन तो स्वीकृत करणे.
७) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापरीक्षकाच्या नेमणुकीसाठी संचालक मंडळाने केलेल्या कार्यवाहीची माहिती घेणे.
८) बँकेच्या ज्ञाठठपुरत व रुसुलीस दुरापास्त झालेल्या कर्ज खात्यांच्या येणे रक्कमा वसूलीबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती घेणे.
९) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१०) संचालक मंडळाने तयार केलेला वार्षिक व दिर्घ मुदत विकास अराखडयास मंजुरी देणे
११) सभासदाच्या बँकीग शिक्षण व प्रशिक्षण याचा आढावा घेऊन पुढील कार्यवाही करणे.
१२) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनेळची येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालिका मंडळाच्या आदेशावरुन
श्री. गायकवाड अंकुश धोंडिबा
मुख्य कार्यकारी अधिकारी दि अंबिका महिला सहकारी बँक लि. अहमदनगर

स्थळ - अहमदनगर
दि. २८/०८/२०२४

विशेष सुचना
१) बचेत सभा दुपारी तीन ३.०० वाजता सुरु होईल. सभा समयुक्ती अभ्यासी तहकुब झाल्यास ही सभा बँकेचे भोटनियम प्रमाणे त्याच दिवशी त्याच ठिकाणी दु. ३.३० वाजता सभासद येईल व त्यावेळी सभेस समयुक्ती नवीन तारी सभेच्या कार्यालय परिक्षेत्रावे नमुद केलेले ठिकाणुसार सभासदास पुर्व होते जाईल.
२) बचेत वार्षिक सर्वसाधारण सभेस हजेरीचा विमानांसंबंधी काही सूचना तपासायच्या असल्यास तिस प्रश्न विमानासाठी असायास त्या लेखी स्वरुपात बँकेच्या मुख्य कार्यालयास सभेच्या तारखेपूर्वी ५ दिवस अगोदर पोहोचविले असा दिलेले पाहवयास. या बाबत येणाऱ्या सूचना व प्रश्नांची उत्तरे सभेत दिली जाणार नाहीत.
३) चर्चेस येताना सभासदाच्या नोंदवहीची ओळखपत्र सोबत आणावे.
४) बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल बँकेच्या मुख्य कार्यालय, सर्व शाखा कार्यालय आणि बँकेच्या www.ambikamahilabank.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दिवाळी मराठी चित्रपट महोत्सव
दि. मुंबई-गोवा घेत्या वेळा बदलू शकतात
दिनांक : 23 ते 30 ऑगस्ट 2024

अहो विक्रमार्कादी	हिंदी	07:15 P.M.
खेल खेल में		04:30 P.M. 10:00 P.M.
चेला गोला	मराठी	01:45 P.M.
स्त्री - २		8:00, 10:00 11:00 A.M., 1:00 1:55,PM 3:50, 4:45, 6:50, 7:40, 9:40, 9:45, 10:00 PM
दि डायरी ऑफ वेस्ट बेंगॉल	हिंदी	11.00 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

शेअरिंग कॅब डेली राईडीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन

दरवेळेस
- नगर वेथून स. ७,८,९ व दुपारी २.००
- पुणे वेथून स.११,१२,२ व सायं.५ पा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
विश्वासाच पॉईंट -पिसाळण बोळ,झोपडी कॅन्टीन, तारकपुर,रिक्षिंग, रात्र पेंशन बोळ,कारंजीच बोळ,केडगाव पुणेकी इतिथ- बाबोली, काराडी बायपास,देवळा, नवीन शिवाजीनगर शाखरोड. **इच्छिक आवश्यक**
अमित-प्रेम हॉलिडेज्
अशिक्षित- विजयेरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

Green Library
EARTH's Greenery for Every Space

Indoor Plants for your Home!
Get a Plant Today!
Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Planters | Garden Lightings
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
✻ डोकेदुखी, मायग्रेन ✻ फिटचे आजार, अपस्मार
✻ हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
✻ तोल जाणे ✻ व्हर्टिगो, चक्कर येणे ✻ अर्धांगवायू, पॅरेलीसीस ✻ विसराळूपणा ✻ थरथर सुटणे, पार्किन्सन
✻ सर्व आजारांसाठी ऐडमिट सुविधा उपलब्ध.
✻ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर
रोज दुपारी १ ते ५ या वेळेत
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.